
अतर्क्य
अनुप साळगांवकर

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# अतर्क्य

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

**पण**

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

गूढकथासंग्रह

# अतर्क्य

लेखक : अनुप अनिल साळगांवकर

# अतर्क्य

## लेखक : अनुप अनिल साळगांवकर

मोबाईल :७७१८९६८९५३/ ९८६९४०४९५३

संकेत स्थळ : www.shabdbramh.wordpress.com

ई मेल : salgaonkar.anup@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com

प्रकाशन : ८ फेब्रुवारी २०२१

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# मनोगत



शब्द ब्रम्ह आहेत. हे विश्वच ध्वनिनिर्मित शब्दांचं आहे. जिथे शब्द संवाद साधतात, शब्द हास्य खुलवतात, शब्द गालावर ओघळतात, शब्द व्यक्त होतात, शब्द ठाव घेतात, शब्द चित्र रंगवतात, शब्द निःशब्द होतात.

महाविद्यालयात शिकत असताना एकदा ओघानं "मृत्युंजय" हे पुस्तक हातात पडलं. अगदी तेव्हापासूनच वाचनाची आवड निर्माण झाली. या पुस्तकांच्या विश्वात मन रमू लागलं. वाचता वाचता लिहावंसं वाटलं. माझ्या मते जेव्हा आपल्याला काहीतरी लिहावंसं वाटतं तेव्हा एका लेखकाचा जन्म होतो. माझ्यातल्या लेखकाचा जन्मही असाच झालाय. लिहायची सुरवात साधारण २०१५ साली झाली. सुरुवातीला चारोळ्या करणे, कविता करणे हे छंद जोपासले. लहान मुलांसाठी गोष्टी लिहिण्याची फार इच्छा होतीच. शेवटी हि लहान मुलंच उद्याच्या समाजाचा आरसा आहेत. त्यांसाठी काही बाळ-बोधकथा लिहिल्या. एका दिवाळी अंकासाठी "आपल्या कोकणातील भयकथा लिहून देशील का?" अशी विचारणा झाल्यावर माझ्यातला लेखकही

जागा झाला. मी स्वतः कोकणातला असल्यामुळे आणि मलाही भयकथेची प्रचंड आवड असल्यामुळे “घुबड" हि पहिली कथा लिहिली. इथेच माझी भयकथा लिहिण्याची सुरुवात झाली असं म्हणावं लागेल. माझ्या जवळच्या एका मित्राला भयकथा फार आवडतात. त्याने “माझ्यासाठी एक भयकथा लिही" असे हक्काने सांगितले. त्याच्यासाठी म्हणून “चेटकी" हि कथा लिहिली. एक गोष्ट लिहायला घेतली त्या एका गोष्टीच्या वर्षभरात पाच गोष्टी कधी लिहून झाल्या माझं मलाच कळलं नाही. माणूस माणसाला घडवत असतो... माझ्या जवळच्या सगळ्यांचाच माझ्या लिखाणात सिहांचा वाटा आहे. आपलेपणाने वाचणे, त्यावर टीका-टिपण्णी करणे, प्रोत्साहन देणे आणि काही नवीन सुचवणे ही कामं माझी माणसं अविरत करत असतात. कौतुक करणाऱ्यांपेक्षा प्रोत्साहन देणारी ही माझी माणसच जास्त महत्वाची. हे पुस्तक माझ्याहीपेक्षा त्यांचं जास्त आहे.

पुस्तकाबद्दल सांगायचं झालं तर, कुणीही चांगलं नाही कि, कुणीही वाईट नाही. माणसाचा स्वभाव हा परीस्थितीनुरुप घडत असतो. घटना घडत असतात आपण फक्त प्रतिक्रिया देत असतो. त्या प्रतिक्रिया कधी क्रोध, कधी दुःख, कधी भय तर कधी आनंद निर्माण करतात. आपलं मन हे फार विचित्र यंत्र आहे. आपल्या मनातही श्री राम - रावणाचं युद्ध सतत चालू असतं. आपण ठरवायचं कुणाला जिंकवायचं. श्री राम जिंकतील ते सत्कृत्य,

आणि रावण जिंकेल ते दुष्कृत्य. कर्माचे चांगले आणि वाईट परिणाम हे होणारच. चांगले परिणाम सुख प्रदान करतील. वाईट परिणाम भीती आणि दुःख. भीती हि कधी कधी फार महत्वाची, त्यानेच आपलं आपल्या मनावर नियंत्रण राहतं. आपण ताळतंत्र ठेऊन वागतो. आपल्या मनात उमजत असलेली भीती हीच भयकथांना जन्म देते. भीतीदायक घटना घडतात त्या प्रत्येकाच्या मनावर थोड्या फार प्रमाणात आपला ठसा उमटवतात. तो ठसा जितका गडद तितकीच भीतीची भावनाही गडद होत जाते. एकांतात आठवत राहते. काही सत्य तर काही कल्पक कथा काही ठराविक काळासाठी आपलं मन गुंतवून ठेवते.

भयकथा, गूढकथा, रहस्यकथा या अबालवृद्धाना आवडतात, हा माझा अनुभव आहे. या पुस्तकातल्या कथा या नक्कीच तुमचं मनोरंजन करतील. तुम्हाला एका वेगळ्या आणि चित्रमय विश्वात घेऊन जातील, एक वेगळं जग निर्माण करतील. हा माझा विश्वास आहे.

मी लिहिलेल्या कथा ह्या पुस्तक माध्यमात सर्वपरिचित व्हाव्यात हि मनोमन इच्छा होतीच. म्हणूनच ई साहित्य प्रतिष्ठानचा हात मी सुरवातीपासूनच अगदी घट्ट धरून ठेवलाय. ई साहित्य प्रतिष्ठान यांनी माझ्यावर विश्वास दाखवून बालसाहित्यावर “बाळबोध" हे माझं पाहिलं आणि प्रवासवर्णनावर अध्यात्मिक यात्रेबद्दल माहिती देणारं “जय गिरिनारी” हे दुसरं पुस्तक प्रकाशित

केलं. त्यांनी दिलेल्या प्रेरणेबद्दल, माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल मी या संपूर्ण ई साहित्य कुटुंबाचा अत्यंत ऋणी आहे.

आपण काहीतरी लिहिणं आणि वाचकांना ते आवडणं या पेक्षा सुख वेगळं ते काय? श्रमसाफल्याचाआनंद हा यातूनच मिळतो. जो चिरंतर समाधान देतो.

मी अत्यंत ऋणी आहे तो तुम्हा साऱ्यांचाच. माझ्या लिखाणाला तुम्ही साऱ्यांनी जो आशिर्वाद आणि शुभेच्छा दिल्यात, ते पाठबळ, ती शाब्बासकी या पुढे ही काहीतरी चांगलं लिहिण्यासाठी मला प्रेरित करेल. हे पुस्तक तुमच्या पाठबळाला मूर्त रूप देण्यासाठी मी केलेला एक प्रयत्न म्हणावा लागेल. हा प्रयत्न तुम्हाला कसा वाटला ते जरूर कळवा.

लिहिणे हा एक वेगळ्या वळणावरचा वेगळा प्रवास आहे आणि तो माझ्या लेखणीच्या पावलांनी असाच अविरत चालू राहील.

शुभं भवतु ... कल्याणमस्तु.

श्री. अनुप अनिल साळगांवकर
मोबाईल :७७१८९६८९५३/ ९८६९४०४९५३
संकेत स्थळ : www.shabdbramh.wordpress.com
ई मेल : salgaonkar.anup@gmail.com

आभार

प्रोफेसर. श्रीगणेश एस. प्रभू

कै. नितीन बाबली पालव

सौ. मधुरा मकरंद जोशी

श्री. हर्षद विष्णू ठाकरे

श्री. मयूर जगदीश शिंदे

श्री स्वामी समर्थ चरणाविंदार्पणमस्तु

## प्रस्तावना

माणसाच्या मनात भय असतंच. त्याचबरोबर मानवी मनाला गुढ गोष्टींचा ठाव घेण्याची एक उर्मी असते. ह्यावर वेगवेगळ्या गुढ कल्पनांचा, अतर्क्य कल्पनांचा जन्म झालेला आहे. यामागे, या कल्पना समजून घेण्यामागे एक प्रकारचे आकर्षण आणि त्याच बरोबर एक वेगळ्या प्रकारचा गुढ आनंद मिळेल असाही एक उद्देश आहे. मराठी भाषेत खऱ्या अर्थाने भयकथा लेखक रत्नाकर मतकरी यांनी आणल्या. पण भयकथा इतर भाषांमध्ये उदा. इंग्रजी भाषेमध्ये जेवढ्या लिहिल्या गेल्या आहेत तेवढ्या मराठीमध्ये लिहिल्या गेल्या नाहीत. रत्नाकर मतकरी यांनी ज्या कथा लिहिल्या त्या गुढकथा म्हणूनही प्रसिद्ध झाल्या. तसे मराठीत रत्नाकर मतकरी नंतर जी ए कुलकर्णी यांनी सुद्धा अशाच कथा लिहिलेल्या आहेत. त्या आणखी वेगळ्या प्रकारच्या गुढ कथा म्हणून प्रसिद्ध झाल्या. पण मराठीत लिहीलेली सर्वात प्रसिद्ध भयकथा लिहिण्याचा मान हा अजूनही जीए कुलकर्णी यांनाच जातो.

या पिढीने जे काही लिहिलं आणि ही जी काही परंपरा मागे सोडली ती पुढे नव्या लेखकांनी नेली पाहिजे आणि या नव्या लेखकांमध्ये श्री. अनुप साळगांवकर हे नव्या दमाचे लेखक म्हणून पुढे येत आहेत. श्री. अनुप साळगांवकर यांनी याआधी पण दोन पुस्तके प्रसिद्ध केलेली आहेत आणि आता ते हे भयकथांचे पुस्तक

प्रसिद्ध करत आहेत. याआधी अनुपजींनी लहान मुलांसाठी एक पुस्तक प्रसिद्ध केलं होतं आणि दुसरं पुस्तक हे त्यांनी गिरनार पर्वतावर यात्रा केली त्याबद्दल आहे. ते स्वतः खूप मोठे श्री. दत्तभक्त असल्यामुळे त्यांनी अत्यंत प्रासादिक भाषेत हे गिरनार वरचे पुस्तक लिहिलेलं आहे. त्यांनी लहान मुलांसाठी लिहिलेलं पुस्तक सुद्धा तितकच सुंदर आहे. ते लहान लहान कथांचे पुस्तक आहे आणि त्या अनेक सुंदर छोट्या बोधकथा आहेत. यातूनच अनुप यांचा लेखन विषयक विषयांचा बराच मोठा आवाका दिसून येतो. अनुपजी यांना हा सर्व ठेवा सर्व लोकांकडे विनामूल्य पोचावा अशी कळकळ आहे, म्हणून त्यांनी पुस्तके ऑनलाइन प्रसिद्ध करण्याचा संकल्प केला आहे. या आधीची दोन्ही पुस्तकं त्यांनी ऑनलाईन प्रसिद्ध केलेली आहेत. हे भयकथांचे पुस्तक सुद्धा ते ऑनलाईन प्रसिद्ध करत आहेत.

मी शास्त्रज्ञ आहे. आणि आम्हाला सुद्धा निसर्गातील, जगातील गुढ आणि अशा बऱ्याच अतर्क्य गोष्टींमागील रहस्य उलगडण्याची फार इच्छा असते. मी ज्या संस्थेत काम करतो तिथेच श्री अनुपजी काम करत असल्यामुळे त्यांचा माझा परिचय झाला आणि त्यांनी मला ही प्रस्तावना लिहायला सांगितली. कदाचित त्यांना असेही वाटले असेल की त्यांना गुढ गोष्टींचा मागोवा घेण्याची आवड आहे तशी आवड आम्हा शास्त्रज्ञांना सुद्धा असते त्यामुळे कदाचित मी या कथा या पुस्तकाबद्दल काही लिहू शकेन

असं त्यांना वाटलं असावं. ते काहीही असो, पण अनुपजींच्या कथा वाचकाच्या मनाचा ठाव घेतात असं म्हणायला हरकत नाही.

माणसाच्या आयुष्यात बरेचदा काही वेळा अशा गोष्टी घडतात की ज्याचं उत्तर सध्याच्या विज्ञानाला ज्ञात नाही. अर्थात त्याचा अर्थ असा नाही की, विज्ञानाला त्या गोष्टी कधीच कळणार नाहीत. पण प्रत्येक पिढीमध्ये विज्ञानाचा जेवढा प्रसार आणि प्रगती झालेली आहे त्या अनुषंगाने गेल्यास त्या त्या वेळेला वाटणाऱ्या गुढ आणि अतर्क्य गोष्टी नंतर मानवाला विज्ञानाच्या बळावर समजून चुकलेल्या आहेत. त्यातून समजलेल्या तत्त्वांचा वापर करून मानवाने स्वतःची भौतिक प्रगती पण केलेली आहे. तरीसुद्धा आज पण निसर्गात अशा अनेक गोष्टी आहेत ज्याचं आपल्याला किंवा विज्ञानाला अजूनही समाधानकारक उत्तर मिळालेलं नाही. त्यामुळेच कदाचित मानवी मनाला अजूनही गुढ गोष्टींचे आकर्षण असतं. त्याच बरोबर ह्या गोष्टी किंवा या गोड कल्पना ह्या बद्दल त्यांच्या मनात एक प्रकारचं भय पण असतं. त्यातूनच अशा कथांचा जन्म झालेला आहे. विशेष म्हणजे अनुपजी हे पण कोकण भागातूनच आलेले आहेत आणि कोकण भाग तर अशा प्रकारच्या गोष्टींचं आगरच आहे. कोकणातील लोकांना भुताखेतांच्या गोष्टी आणि अशा प्रकारच्या भयपूर्ण गोष्टीचं फार आकर्षण आणि त्यांच्याकडे या गोष्टींचा खूप मोठा ठेवा पण आहे. त्यामुळेच अनुपजींच्या कथांमध्ये आपल्याला कोकणातील गावाकडील

गोष्टी आणि तिथली माणसं, तिथलं वातावरण आणि तिथल्या निसर्गाच वर्णन सापडत. या कथा वाचताना अनुपजी आपल्याला त्यांच्या कथेतील पात्रांसोबत संपूर्ण त्या वातावरणात फिरवतात आणि आपल्याला त्या पात्राला आलेल्या अनुभवाचा अनुभव देतात. त्यामुळेच त्यांच्या भयकथा या अतिशय परिणामकारक झालेल्या आहेत.

या पुस्तकातील त्यांची पहिलीच कथा “पिंपळ" ही एका झाडाभोवती गुंफलेली आहे. कोकणातील झाडांना व्यक्तिमत्व असतं ते कसं, ते ही कथा वाचून कळेल. तसंच त्यांची दुसरी कथा ही वाड्यावर आहे. कोकणात करणी करणे हा एक मोठा इतर लोकांना त्रास देण्याचा प्रकार आहे. ह्या कथेत या करणी बद्दल आणि त्या कशा उलट फिरवायच्या त्याबद्दल ही कथा आपल्याला सांगते. ज्यांना कोकणातील ह्या गोष्टींबद्दल माहिती नाही त्यांनाही एक वेगळ्या प्रकारचा अनुभव ही कथा देईल. या नंतरच्या त्यांच्या दोन कथा या “मल्लम्मा" आणि “चेटकी" या नावाच्या आहेत. त्यामध्ये अनुपजींनी कोकणातील गावातील किंवा गावाबाहेरील गूढ ठिकाणावरील देवस्थाने आणि त्या वरची गावाची श्रद्धा आणि त्यातून निर्माण झालेल्या नाट्यावर त्या दोन कथा आहेत. त्यानंतरची त्यांची कथा “घुबड" म्हणून आहे. कोकणात घुबडाला अशुभ मानतात. जरी तो पक्षी निसर्गात तसा निरुपद्रवी आणि आपल्याला फार मदत करणारा असला तरी कोकणातील लोकांना

त्या पक्षाबद्दल एक प्रकारची भीती मनात असते. अनुपजी यांनी या भीतीचा उत्तम वापर या कथेमध्ये केलेला आहे. ह्या कथेचा नायक आहे त्याला आलेले अनुभव त्यांनी उत्तम रीतीने या घुबडाच्या एका प्रतिमेशी निगडित केलेले आहेत. त्यातून अतिशय उत्तम अशी भयकथा अनुपजींनी निर्माण केलेली आहे. मला वाटतं की अनुपजी यांनी फार उत्तम प्रकारे या कथा लिहिलेल्या आहेत त्यातून त्यांची प्रतिभा अधिकाधिक फुलत गेलेली आहे आणि ती अशीच अधिकाधिक खुलत जावो आणि त्यांच्या हातून उत्तम उत्तम अशाच प्रकारच्या भयकथा आणि इतरही कथा लिहिल्या जावोत ही माझी त्यांना शुभेच्छा आहे.

मी स्वतः काही लेखक नाही पण वाचक मात्र आहे. अनुपजींनी माझ्यावर एवढा विश्वास ठेवून मला या पुस्तकाची प्रस्तावना लिहायला सांगितली हा मी माझा सन्मान समजतो. त्याच बरोबर त्यांच्या या सुंदर पुस्तकासाठी आणि त्यांच्या या कथांसाठी सुयश चिंतितो. त्यांच्या हातून असंच उत्तम लेखन होत रहावं आणि मराठी साहित्यात एका नव्या दमाच्या लेखकांची भर पडावी आणि अनुपजींच सर्व साहित्य ऑनलाइन लाखो मराठी लोकांनी वाचावं अशी मी देवाकडे प्रार्थना करतो

प्रोफेसर. श्रीगणेश एस. प्रभू , शास्त्रज्ञ

मुंबई

सदर पुस्तकातील कथा या पूर्णपणे काल्पनिक आहेत. त्यांचा वास्तविक व्यक्ती, स्थळे व घटना यांच्याशी काहीही संबंध नाही. असा संबंध कोठेही आढळल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.

# पिंपळ




घाटाच्या शंभर-दिडशे पायऱ्या उतरून अधीर चर्णावतीच्या पाण्यात पाय बुडवून बसला. मुंबईहून नुकताच प्रवास करून आल्यामुळे थोडा थकला होता. गावात जाताना वाटेवरच्या नदीच्या घाटाच्या सौंदर्याने त्याला मोहीत केलं होतं. पाण्यात पाय घातल्यावर पायाला जाणवणारा थंडगार पाण्याचा स्पर्श त्याला सुखावत होता. पायाच्या बोटांची पाण्यातली हालचाल अधांतरी हवेत असल्याचा भास निर्माण करत होती. समोर मावळतीला जाणारा सूर्य पांढऱ्या शुभ्र ढगांवर लाल गुलाल उधळून दिवसाचा निरोप घेत होता. नदीच्या पाण्याचा खळखळाट त्या सायंकाळच्या

शांत वातावरणाला भेद देत कान तृप्त करत होता. खुळ खुळ घुंगरू वाजवत चर्णावती संथ वाहत होती. आता पाच दाह मिनिटात गावात परत जायचं म्हणून उठणार इतक्यात, त्याने पाण्याचं पात्र नजरेने मापत काठावरून पल्याड पहिलं. नदीच्या पलीकडे असलेल्या भल्या मोठ्या पिंपळावर त्याची नजर स्थिरावली. अतिशय जुनाट असा, दहा जणांच्याही कवेत मावणार नाही एवढा मोठा बुंध्याचा भाग दुरूनही नजरेला विस्तिर्णच दिसत होता. काळी करपटलेली बदामाच्या आकाराची पाने त्याला खुणावत होती. सळSS… सळSS …. सळSS … सळSS… त्या पानांचा सळसळाट इतक्या दूर असूनही त्याला स्पष्ट ऐकू येत होता. नदीचा खळणारा, कानांना सुखावणारा प्रवाह आणि त्या पिंपळाचा सळसळाट अचानक त्याच्या कानांना नकोसा वाटू लागला. त्याचे कान एकाएकी सुन्न झाले. त्या पानांची सळसळ त्याला स्वतःकडे आकर्षित करत होती, डोळे सताड उघडून डोळयात भरलेला त्या पानांचा गडद काळा रंग, सरसरून थंड पडलेल्या शरीरातल्या मनाची निर्विचारी स्थिती आता त्याला आतूनच अस्वस्थ करत होती. क्षणात …झपकन वाऱ्याची एक वादळी झुळूक आली आणि पिंपळावर आदळली… पिंपळाची सगळीच पान झाड सोडून सैरावैरा पळत सुटली सपSS… सपSS…सपSS… सपSS… अधीरच्या अंगावर धावून आली. एकामागोमाग एक करून ती त्याच्या चेहऱ्यावर आदळू लागली. अधीरने दोन्ही

हाताच्या मनगटाची फुली करून डोळे झाकले खरे, पण त्या हाताच्या बोटांमधल्या फटीतून, किलकिल्या नजरेने तो समोरचं जे काही घडतंय ते पाहत होता. क्षणभरातच कानाभोवतीचा आवाज जरा मंदावला तसे त्याने हाताची बोटे अजून थोडी रुंदावून बोट्यांच्या मोठाल्या फटीतून समोर पहिले. त्या पिंपळाच्या झाडाच्या फांद्यांवर आता एखाद -दुसरं पान शिल्लक असेल. पानांशिवाय पिंपळाच ते बोडकं झाड आता फारच भयंकर दिसत होतं. त्या झाडापाठी लालेलाल सूर्य आता जमिनीला टेकला होता. अंधार वाढला तश्या झाडाच्या फांद्या एकात एक गुंफू लागल्या… झाडाचा शेंडा आभाळ गाठू लागला … त्या विस्तिर्ण झाडाचा आता आकारच पालटू लागला … फांद्या शंभर हातासारख्या दिसू लागल्या… त्या फांद्यांच्या बोटांची ती वळवळ दुरूनही डोळ्यांना स्पष्ट जाणवत होती….ते फांद्यांचे लांबसडक हात पुढे सरसावून आपल्या गळ्याचा सहज घोट घेतील, अशी भीती अधीरच्या डोळ्यात दाटून आली… मुंडक नसलेल्या मानवी धडासारखं ते झाड आता खूप भयानक आणि किळसवाणं वाटायला लागलं. चर्णावतीही वेगाने कर्कश्य आवाज करत धावू लागली. क्षणभरापूर्वी मनोहर वाटणारा हा सारा परिसरच आता त्या झाडासारखा विचित्र आणि भयावह वाटू लागला. वेळेचं भान ठेवत गावाकडे जायला अधीर पाठी वळणार इतक्यात सपा SS… सपSS…ती उरलेली दोन- एक पाने त्याचा कानावर येऊन

चिटकली. क्षणार्धात त्याने डोळे करकचून मिटून घेतले नी दोन्ही हाताने कान बंद केले… सगळीकडे स्मशान शांतता पसरली…. कानात एकच आवाज घुमला …. “मला वाचव” …या आवाजाने अधीरचे डोळे लख्ख उघडले … कानावरचे हात सरले …कानाला चिकटलेली पाने सर्र्र्र्र्रकन उडून गेली … समोरच ते पिंपळाचा झाड फांद्यांचे सहस्र हात अधीर समोर पसरून उभं होतं. ते पुढे सरकणार इतक्यात प्रसंगावधान राखत गावाच्या दिशेने धूम ठोकली.

पहाटे झुंजूमुंजू झालं, कोंबड्याने बाग दिली, कोवळी सूर्याची किरणं अंगावर पडली तशी अधीरला जाग आली. डोळे किलकिले करुन त्याने पाहीलं, नातू उठला म्हणून आजी त्याच्या बाजूला येऊन बसली. मोठ्या मायेनं त्याच्या केसातून हात फिरवला. ग्लासभर गरम, ताज दूध देऊन म्हणाली, “जरा तब्बेतीची काळजी घेत जा … किती वाळलायस… काल रात्री आलास तसा काहीही न खाता, न बोलता झोपलास…. असं उपाशी पोटी झोपू नये …वाईट वंगाळ स्वप्न पडतात.” ग्लासभर दूध घेऊन काहीही न बोलता अधीरने आन्हिक आटोपले, तरी त्या पिंपळाच्या झाडाचा विचार सतत त्याच्या मनात येतच होता. आजीने अधीरला आवडते म्हणून दुपारच्या जेवणात केळफुलाची भाजी केली होती. जेवणातही त्याचे लक्ष लागे ना. आजीलाही जाणवले कि अधीर कसल्यातरी विचारात सकाळपासून व्यस्त आहे. काहीतरी

बिनसलंय लेकाचं. मुंबईतल्या कामाचा खूप ताण असेल म्हणून तिनेही फार लक्ष दिले नाही. सायंकाळ पर्यंत सगळं निवळेल म्हणून गप्प बसली. सायंकाळ झाली उन्हं कलली. दिवेलागणीच्या वेळ झाली. आजीने वात वळली, दिव्यात तेल घालून उजळवली. देवाला नमस्कार केला. रात्रीचे जेवण उरकून अधीर आजीच्या मांडीवर डोकं ठेवून अंथरुणावर पडला. आजीने “ ये केसांना तेल चोळून देते.” म्हणून त्याला जवळ घेतले. त्याच्या केसावरीं हात फिरवला आणि म्हणाली, “ मुंबईच्या व्यापात एकदा का माणूस अडकला कि तो पुन्हा गावाकडे फिरकत नाही. तू मात्र आठवण आली कि येतोस मला भेटायला. तू येणार या एकाच आशेवर अजूनही दिवस ढकलतेय. तु आलास की, तुझ्या मुंबईकडच्या गप्पा कधी संपतच नाहीत. मलाही तुमच्या सगळ्यांची खुशाली तुझ्याकडूनच समजते. आजचा दिवस सरला, तू माझ्याशी काहीच बोलला नाहीस… काही बिनसलंय का रे बाळा? कुणाशी भांडून आलायस का मुंबईहून? मला सांग रे …. मी बघते एकेकाकडे” आजीचे बोलणे ऐकून अधीरने आजीचा हात घट्ट धरला, आजीच्या हाताला त्याचा स्पर्श जरा वेगळा, भीतीने भेदरलेला जाणवला. आजीला कालच्या घडलेल्या पिंपळ बद्दल काही सांगू की नको …???असा विचार करत,” तसं काहीच नाही गं…. ते … ते…काल….काळं …. पिंपळ” असं काहीसं पुटपुटला.”पिंपळ” हा शब्द गरम तेलासारखा आजीच्या कानात शिरला आणि आजीने

झटकन आपला हात त्याच्या हातून सोडवून घेतला.... दोन्ही हातांनी लोटून अधीरला मांडीवरून दूर सारला,” मेल्या ... घाटावर गेलेलास तू .... तुला कितींदा सांगून झालं ... बजावून झालं...घाटावर फिरकायचं नाही ... तो पिंपळ कैकांना खाऊन झालाय.” एवढं बोलून आजीने तोंड मिटलं. पूर्वी ती एवढंच सांगायची, कि”घाटावर जायचं नाही.” आज तिने का जायचं नाही याचा थोडा उलगडाही केलेला कि, तो पिंपळ ... तो ...कैकांना ... म्हणजे काल संध्याकाळी जे काही घडले तो अधीरचा भास नव्हता. घडलेल्या घटनेने अधीर आता खूप बेचैन झाला ...त्याच्या धीर आटू लागला...आजीला सारखं त्या पिंपळाबद्दल विचारू लागला.” सांग ना आजी .... तो पिंपळ नक्की काय करतो .... आणि कुणाला खाल्लं त्याने ... ए आजी ...सांग ना ... तू नाही सांगितलेस तर मी जाऊन त्या पिंपळालाच विचारीन.” अधीरची उत्सुकता आता शिगेला पोहोचली होती. आपल्या लाडक्या नातवाची काळजी आजीच्या डोळयात अश्रू बनून ओघळत होती. खूप रात्र झाली होती. देवाजवळचा दिवाही मंदावला होता. अधीरला पुन्हा मांडीवर घेऊन कुरवाळत, मनावर दगड ठेऊन आजीने त्याला आता सगळं सांगायचं ठरवलं. कालपटलाचे पदर एक एक करून बाजूला सरु लागले. आजी भूतकाळ जिवंत करु लागली.

“तुझ्या आजोबांचा जसा देवावर विश्वास नव्हता तसा भूताखेतांवर सुद्धा नव्हता. अगदी नाकासमोर चालणारा माणूस. लग्न करून आम्ही या गावात नवीनच राहायला आलो. सगळं काही सुरळीत चालू होतं.”घाटावरच्या पिंपळावर मुंजा राहतो” ही गोष्ट साऱ्या गावाला ठाऊक होती. गावात काहीही वाईट घटना घडली कि त्याचं खापर त्या पिंपळावरचं फुटायचं…कुणीही तिकडं फारसं फिरकायचं नाही… पिंपळाला अनेक दूषणं दिली जायची … दोन चार वर्ष हे असंच चालू होतं. त्यानंतर एक वाईट घटना आपल्याही घरात घडली तुझ्या वडिलांपाठचं एक मुलं जन्माला येताच दगावलं. तुझ्या आजोबांना या घटनेने हेलकावून सोडलं. हे विमनस्क मनस्थितीत असताना, सगळ्या गावभर तेव्हाही त्या पिंपळाच्या वाईट सावलीची चर्चा झाली. गावात हे कुठेही गेले तरी सतत पिंपळ …. पिंपळ …. ऐकून यांच्या मनात वेगळीच तिडीक गेली. घरी आल्यावर हे वेड्यासारखेच वागायला लागले. त्या पिंपळाला मी आज संपवणार असं म्हणून घराबाहेर पडले … मी त्यांना थांबवण्याचा खूप प्रयत्न केला … पण माझं काहीही न ऐकता मला उंबऱ्याआत लोटून ते निघाले … थोड्या वेळातच गावकरी घराबाहेर येऊन गर्दी करून राहिले. माझ्या हृदयाचा तर ठोकाच चुकला. त्याच गर्दीतून वाट काढत ह्यांनी घरात पाऊल ठेवले. अश्रू भरलेल्या नजरेने मी त्यांना पाहीले. अंगावरचे कारपटलेले कपडे, राखेने माखलेला चेहरा पाहून माझा थरकाप

झाला… माझ्याकडे नजर रोखून म्हणाले …. ‘पेटवलं …. अख्खं झाड पेटवलं … आता कुणालाही त्रास होणार नाही.’ साऱ्या गावाने या घटनेनंतर सुटकेचा निश्वास टाकला खरा, पण यांच्या कानात दडे बसून “मला वाचव …. मला वाचव” हे शब्द सतत घुमत राहिले आणि त्यातच त्यांचा काही दिवसातच वेडाच्या तीव्र झटक्यात मृत्यू झाला. तुझे वडील फार लहान होते…मी एकटी पडले रे…. हा एकटेपणा फार वाईट…धड जगूही देत नाही…आणि मरुही देत नाही. तो एकटेपणा पुन्हा आपल्या कुणाच्याही वाट्याला येऊ नये. म्हणूनच, मी तुला घाटावर जाऊ देत नाही. पूर्ण जळलं तरीही ते झाड जमीनदोस्त झालं नाही, अजूनही तसंच उभं आहे. … त्याची काळी सावलीही तुझ्यावर नको पडायला…शोधतयं ते…कुणालातरी… सळसळतंय काहीतरी त्याच्या मनात…आजही…

आज दिवसभरात अधीरचा सूर काही लागत नव्हता. त्याच्या अस्वस्थ मनाची प्रचंड चिडचिड होत होती. आजीने जे काही सांगितले त्याचा आणि”मला वाचवं” या विनावणीचा काहीच संबंध लागत नव्हता.’’घरातून बाहेर पडायचं नाही,’’ असं आजीने आज बजावलं होतं. त्यामुळे घरातून काढता पाय घेणंही त्याला अशक्यच होतं. मुंबईला परतण्याचीही जरा घाईच होती. त्या पिंपळाच्या झाडाचा आणि आजोबांच्या अकाली मृत्यूचा त्याला

लवकरच काहीतरी सोक्ष-मोक्ष लावायचाच होता. त्याशिवाय त्याला जराही शांती लाभणार नव्हती.

अपरात्री आजीचा डोळा लागलाय हे पाहून अधीर हळूच घराबाहेर पडला. रात्रीचा किर्रर अंधारात चाचपडत चर्णावतीच्या घाटावर पोहोचला. चर्रर.... चर्रर ... पाचोळ्यात पावलं वाजवत इतक्या भयाण अंधारात घाटाच्या पायऱ्या उतरताना आता त्याला जराही भीती वाटत नव्हती. त्याच्या मनत फक्त प्रश्न आणि त्यांची अनुत्तरित उत्तरं हेच चक्र अव्याहत चालत होतं. काहीही झाले तरी त्याला ती ऊत्तरं आज पिंपळाच्या झाडाकडून मिळवायचीच होती. तशी त्याने आपल्या मनाशी खूणगाठच बांधली होती. अतिशय निर्भयपणे घाटाच्या पायऱ्या उतरून तो किनाऱ्यावर उभा राहीला. डोळ्यात प्रश्नाचं वादळ घेऊन त्याने समोर पाहिलं तर ते पिंपळाच झाड अंधारातही आपले पाय रोवून त्यासमोर घट्ट उभं होतं. रात्रीच्या निळसर चंद्रप्रकाशात न्हाऊन निघालं होतं. ती जळलेली काळी पानं आता चंदेरी निळसर दिसत होती. वाराही संथ गार वाहत होता. त्या वाऱ्यावर फेर धरुन ती पिंपळाची पाने किलकिल करुन नाचत होती. समोरचं दृष्य अगदी सुंदर चित्रवत शांत आणि प्रसन्न दिसत होतं. आज अधीरला त्या झाडाचा भूतकाळ आणि आजोबांच्या अकाली मृत्यूचं गूढ या दोन्ही गोष्टी जाणून घायच्या होत्या, त्याशिवाय गावातलं हे भयाचं तांडव संपणार नव्हतं.''मला वाचव'' असं ते झाड का म्हणालं? त्यामागचा उद्देश नक्की काय?

आजोबांच्याही कानाला का दडे बसायचे? त्यांना अचानक येणाऱ्या या मृत्यूचं कारण काय? गावातल्या ऐकीव गोष्टीत खरंच तथ्य आहे का? अशा अनेक प्रश्नांची चलबिचल त्याच्या मनात सुरूच होती. सळSS… सळSS … सळSS … सळSS… एकाएकी ते झाड सळसळलं… …तसा अधीरच्याही अंगावर सरसरून काटा उभा राहिला… पोटात खड्डा पडला….अधीरच्या मनाचा मागोवा कदाचित त्या झाडानेही घेतला होता. क्षणात सारं वातावरणच बदलून गेलं. चर्णावती निस्तब्ध वाहू लागली… झाडाची सळसळ थांबली… वाराही निपचीत वाहू लागला. ते पिंपळाच झाड आज अधिरला सगळ्या प्रश्नांची उत्तरं देणार होतं, इतकी वर्षे मनातलं सारं सांगून, स्वतःला या परकायेतून मोकळं करून घेणार होतं. अधीर परिस्थितीला न घाबरता किनाऱ्यावर तळ ठोकून उभा राहिला. त्याने नदीत पाहिलं… नदीत चंद्रबिंब गडद झालं… चर्णावतीत शुभ्र चंद्रप्रकाश तरळू लागला…नदीच्या संथ प्रवाहाच्या पडद्यावर आता त्या पिंपळाचा जीवनपट हळूहळू उलगडू लागला… शुभ्र प्रकाशात अधीरचे डोळे लक्ख उघडले… त्या विस्फारलेल्या डोळ्यांनी त्याने नदीत पाहीलं.

शतकोत्तर घडून गेलेल्या घटना जशाच्या तशा एकपाठोपाठ एक पाण्यावर तरळत होत्या, डोळ्यांना स्पष्ट दिसत होत्या… अगदी काल-परवा घडल्या अशाच… एकामागून एक घटनेची शृंखलाच अधीरपुढे चित्रफितीसारखी झळकत राहीली….

पूर्वापार पक्षांनी झाडावर बसून खाल्लेल्या फळांच्या अनेक बिया चर्णावतीत वाहून किनाऱ्याला लागायच्या. नदीकाठच्या सुपीक जमिनीत त्या रुजायच्या आणि तग धरून उभं राहायच्या. नदीशेजारच्या याच सुपीक जमिनीत असे अनेक वृक्ष रुजले, वाढले, बहरले. असंच एक जंगल चर्णावतीच्या किनाऱ्यावर उभं राहिलं. फुला-फळांनी वेढलेलं, कळी-पानांनी बहरलेलं. नदीकाठी अनेक प्राणी, पक्षी आणि त्यानंतर गावे वसू लागली. गावातील जमात सुरुवातीला उपजीविकेसाठी जंगलातील लाकूडफाटा गोळा करणं, फुले-फळे गोळा करून बाजारात विकणं हे उद्योग करीत. हळूहळू त्यांच्यात सुधारण्या होत गेल्या. अनेक नवनवीन गोष्टी कळू लागल्या. त्यातच पिंपळापासून लाख तयार करता येते आणि बाजारात या लाखेस खूप मागणी आहे म्हणून हा लाख तयार करण्याचा नवा उद्योग त्यांनी सुरु केला. जंगलात अमाप पिंपळाची झाडे होतीच. ती झाडे तोडण्याऐक्षा हे गावकरी ठरवून एखाद्या पिंपळाच्या झाडापाशी जमायचे त्या झाडाला रिंगण घालून उभे राहायचे आणि मोठ्या मोठयाने त्या झाडाला दूषणं द्यायचे. काही दिवसातच ते झाड कोलमडून पडायचं. ह्या कोलमडून पडलेल्या झाडापासून लाख तयार करायचे आणि बाजारात विकून बक्कळ नफा कमवायचे. त्यांचा हा उद्योग अनेक वर्ष चालू होता. या लाखेच्या उद्योगापायी जंगलात अनेक जिवंत पिंपळाच्या झाडांनी आपला जावं गमावला होता. आता चर्णावतीच्या किनाऱ्यावर

पिंपळाच एकच झाड उरलं होत. सजीव असलं तरी ते पळू शकत नव्हतं. आपला जीव वाचवणं त्याला भाग होत. कुणीही गावकरी त्या झाडाबाजूने गेला कि, ते विचित्रच सळसळायचं ... जंगलातली शांतता चिरुन तो आवाज खूप भेसूर आणि विचित्र वाटायचा... झाडाखालून चालणाऱ्याची घाबरगुंडी उडायची... दरदरुन घाम फुटायचा... एकट्या दुकट्या व्यक्तीला पाहून तो पिंपळ सळसळून आपली सुकलेली पानेही झाडायचा...अचानक आपल्यावर पडलेल्या एवढ्या पानांच्या गर्तेत व्यक्तीस श्वास घेणेही कठीण व्हायचे...गुदमरून त्यातच काहींचा मृत्यू व्हायचा... एकाएकी गावात श्वास लागून अनेक माणसे मरू लागली. गावात एकच खळबळ उडाली. पिंपळाचा भीषण अनुभव बऱ्याच गावक-यांना आला होता. गावकरी त्या पिंपळाच्या रस्त्याला जायचे टाळू लागले. पिंपळाच्या झाडाची गावकऱ्यांपासून सुटका झाली खरी पण"पिंपळावर मुंजा राहतो" हि अफवा गावभर पसरली. त्या पिंपळा आजूबाजूचा परिसर हळूहळू निर्मनुष्य झाला. घाटावरही कुणी फिरकेनासं झालं. गावक-यांची भीती त्या जागेत झिरपल्याने झाडाचा परिसर खूपच निरव आणि भयप्रद जाणवू लागला. अधीरच्या आजोबांनी गावगुज ऐकून आपल्या घरावर आलेल्या दुर्दैवी प्रसंगासाठी पिंपळालाच जबाबदार धरले. कोणताही पुढचा-पाठचा विचार न करता त्यांनी निष्पाप झाड क्षणात पेटवून दिले. त्यानंतर परतताना त्यांना चर्णावती नदीच्या पाण्यात झाडाचा हा

सारा भूतकाळ दिसला होता. आपलं कर्म चुकलं आणि एक पाप आपल्या हातून घडलं असं त्यांना सतत वाटू लागलं. कुणाच्याही नजरेला नजर देण्याचं धाडस गमावून बसले. मनावर अगदी खोल परिणाम झाला. ते वेडसर वागू लागले, त्यातच त्यांचा मृत्यू झाला.

अधीरला आता खरं खोटं काय ते कळलं होतं. पहाटेचा पहिला प्रहर सुरु झाला तसा गार वारा अंगाला झोंबत होता. निळसर आकाश, तांबूस नारिंगी रंगात उजळत होतं. आजी उठायच्या आत तो घाटावरुन झपझप पावलं टाकत घरी परतला.

ते झाड पुन्हा हिरवंगार उभं करणं हे नवं आव्हान आता त्याच्यापुढे उभं होतं. त्याला त्या पिंपळाला नवजीवन द्यायचं होतं. त्याच्या जगण्याच्या सगळयाच इच्छा पूर्ण करायच्या होत्या. साऱ्या गावक-यांच्या वतीने त्याला त्या झाडाची माफी मागायची होती. दिवसभर हाच विचार त्याच्या मनात रुंजी घालत होता. सायंकाळी अचानक तांब्याचा कलश आणि पुजेचं सारं साहित्य घेऊन अधीर लगोलग घाटावर पोहोचला. उन्हं कलायला लागली होती. अधीरने समोरच्या किनाऱ्यावर उभ्या त्या पिंपळाकडे पाहिलं. मावळतीची किरणं त्या झाडावर पडून त्या किरणात चमकणारं ते सोनेरी झाड आज फारच आनंदी दिसत होतं.


पाण्यात उतरुन अधीरने जवळच उभ्या होडीची कास हळूच सोडली. धीम्या पावलाने होडीत बसून वल्ह्याने पाणी बाजूला सारत तो नदी पार करू लागला. नदीच्या पाण्याचा वेग मंद होता. हळूहळू

अंधार वाढत होता. अंधारात फक्त चंद्राचा प्रकाश पाण्यावर पडून इतरत्र पसरला होता. आकाश पुन्हा निळसर काळ्या ढगांनी वेढलं होतं. काही वेळातच नाव समोरच्या किनाऱ्याला लागली. अधीर सावकाश किनाऱ्यावर उतरला नाव बांधून घातली. त्या तांब्याच्या कलशात चर्णावतीला हात जोडून पाणी भरुन घेतलं. मागे वळून समोर पाहतो तर... ते भलं मोठं पिंपळाच झाड...इतक्या अवाढव्य झाडापुढे आपण अतिशय खुजे असल्याची जाणीव झाली. अधीर शांत मनाने आणि प्रसन्न मुद्रेने त्या झाडापाशी पोहोचला. आणलेल्या पुजेचे सामान मांडून त्याने हळद-पिंजर वाहून, कापूर-उदबत्या पेटवून त्याने पिंपळाची मनोभावे पूजा केली. झाडावर गावक-यांनी केलेल्या अन्यायाची माफीही मागितली. कलशातून आणलेलं चर्णावतीचं पाणी झाडाला घातलं. इतकी वर्षे तहानलेलं ते झाड घटाघटा पाणी प्यायलं, हे पाहून अधीरने अजून दोन-चार कलश पाणी आणून झाडाला घातलं. झाडं पाणी पिऊन तृप्त झालं तसा तो गावात परतला. दिवस संपला...

आज पहाटे अधीर जरा गडबडीत मुंबईला परत जायला निघाला होता. एक कोसभर चालून त्याला वेळेत एस. टी. गाठायची होती. झपझप पावलांना वेग देत घाटाशेजारच्या रस्तावरुन चालताना त्याला पलिकडून सळSS... सळSS ... सळSS .... सळSS... आवाज आला. त्याने आवाजाच्या दिशेने पाहीलं ...आणि अवाक झाला... ते... ते... झाड ... पिंपळाचं

झाड ...तिकडे नव्हतंच... त्याने जवळ जाऊन पाहीलं तेव्हा त्याला जाणवलं... मुळासकट उमळून ते चर्णावतीत वाहून गेलं होतं...त्या झाडाची चर्णावतीने जलसमाधी स्विकारली होती... आज त्याला खऱ्या अर्थाने मुक्ती मिळाली होती...कायमची.

# वाडा




पहाटे माजघरातल्या उंची फळीवर हळदीच्या कापडात गुंडाळलेली तीन शेंदूर फासलेली लिंबा सापडली तसो म्होरक्या

गावभर बोंबलत फिरलो,"तात्यांच्या वाड्यावर कुणीतरी करणी केली." तात्यांची जरब इतकी कि, सगळया गावात शांतता पसरली. भल्या पहाटे ह्या काय कानावर पडला म्हणून गाव नि:शब्द झालो. इकडे सगळो वाडो पटदिशी माजघरात गोळां झालो. हळदीच्या मांजरपाट कापडावरली फळीवरची ती लाल भडक लिंबा बघून घरच्यांची तोंडा पार सुकून गेली. तात्यांच्या उभ्या जन्मात वाड्यात असां काही अभद्र घडूक नव्हता. लागलीच आजीच्या झरझरणाऱ्या डोळयाक पदर लागलो. सगळे आजेक धीर देत होते."काय होना नाय गे..." तेवढ्यात तात्यांनी आरोळी फोडली, त्यापुढे कुणाच्या तोंडून ब्र निघालो नाय. परसदाराच्या दिशेनं चार पावला टाकून, तात्यांनी जोराची हाक मारली," दिगू SSS ... !!!!" केळीच्या बागेतून परसाआड लागलीच दिगू धावत इलो. तात्यांची भेदक नजर दिगूवर पडली. त्यांनी काहीही बोलूच्या आत दिगूनं माजघरात जाऊन पहिला आन पटदिशी ता हळदीचा कापड लिंबासकट गुंडाळला आणि दूर माळावर चालत सुटलो. सूर्य माथ्यावर येऊच्या आधी ती करणी माळावर जमिनीत खोल पुरूची होती. सगळा घर निपचित पडला.

कोकणच्या समुद्र किनाऱ्यावर कायरकरांचो ह्यो मोठ्ठालो वाडो, खाली- वर मिळून दहा खोल्ये. उठ-बस करुक पंधरा -वीस माणसां, दोन गडी, परसदारी तुळशीचा मोठ्ठा वृंदावन, त्या तुळशीत पाणी घालून भल्या पहाटे आजेनं श्रद्धेनी खोवलेली आगरबत्ती

वाडाभर दरवळूची. सगळो वाडो सांजेला दिव्यांनी मंदिरासारखो उजळून जाऊचो. दिसभर आडावर कुणी ना कुणी पाणी काढत असायचा. कळशी पाण्यात पडूची तेव्हा धबकन पाण्याचो आवाज होऊचो. केळीच्या बागेक पाणी दिला कि तांबड्या मातीचो सुवास नाकात घर करून रवचो. तात्या इले कि व्हरांड्यात झोपाळयावर पाय सोडून झुलत रवचें. झुल्याचो कर्ररररररर... कर्ररररररर... आवाज कान पोखरुचो. वाड्या भोवतालची नारळी पोफळीची झाडे वाड्यावर सावली धरूची... दिसभर सळसळ करुची. गौरी - गणपती, दिवाळ सणांका वाड्यात हि वर्दळ उचंबळूची. गावातली कोण न कोण सतत वाड्यावर येऊंची. सण असो नसो आजेनं कुणाक गोडधोड कधी कमी पडून दिल्यानं नाय. आजीचो देवाधर्मावर खूप विश्वास. सगळा आपणहून करुची, देवघरातली रोजची पूजा, मूळपुरुष - राखणदाराचो मानपान... सगळाच थोरल्या पोराबाळांकडून करून घेऊंची. दर अमावस्येक मूळपुरुषाचो मान कधी चुकलो नाय. त्या दिवशी तिन्हीसांजेक आजी आठवणीनं तात्यांच्या हातात शेंडीवालो नारळ ठेऊची. तात्या थोरल्याक सोबत घेऊन वेशीवर जाऊन पूजा करून, नारळ अर्पण करून यायचे. आजीक देवाधर्माचं करण्यास कुणी पोरानं नकार दिलो की,"पूर्वापार पिढ्यान पिढ्या चलत इला सगळा ... करुकच लागतला. त्याशिवाय पूर्वजांचे आशिर्वाद मिळूचे नाय..." असं दामटवून म्हणायची. कुणी न सांगता आपणहून देवाक एक फुल

जरी वाहिला तर''शाणा माझा बाळ ता'' असं म्हणून डोक्यावर हात फिरवून खडखडे लाडू हातावर ठेवची. अशा या पुर्वजांच्या वास्तव्यानं पवित्र झालेल्या वाड्यात, भरल्या घरात ही अशी दळभद्री घटना घडली ज्याने सगळे अस्वस्थ झाले. प्रत्येकाच्या डोळ्यांत ती लिंबावरली लाल भिती दाटून रवली.

श्री. भगवान दामू कायरकर हे गावातील प्रतिष्ठित उंचपुरी व्यक्तिमत्व. पांढरा हातासरशी धोतर, पांढरो शर्ट त्यावर काळो कोट, डोक्यावर काळी टोपी. पायातली कोल्हापुरी चर्र्र्र ... चर्र्र्र... आवाज करायची. त्या आवाजाने दुरूनही तात्या येत असल्याची वर्दी मिळायची. कुणी वाटेत त्यांच्या समोर उभो रवचो नाय. यांच्या करारी स्वभावामुळे गावात वाड्याकडे वाकड्या नजरेने बघूची आजतागायत कुणाचीही हिम्मत होऊक नाय. या एका घटनेने वाड्यातील वातावरण पार ढवळून निघाला होतां या मात्र खरां. दिनूला काम सांगून घराबाहेर पडलेले तात्या त्या दिवशी दुपार झाली तरी जेवूक इले नाय. दुपारची उन्हं पार अंगणात इली. आजी काळजी करूक लागली. सकाळी जा पहिला त्याची भीती आणि तात्यांची काळजी तिच्या डोळ्यांतून ओसंडून वाहत होती. इतक्यात अंगणात तात्यांच्या चपलेचो आवाज इलो चर्र्र्र ... चर्र्र्र... आजी लगबगीनं दारात उभी रवली. तात्या चप्पल काढून घरात पाऊल टाकताच आजी पदरानं डोळे पुसून म्हणूक लागली''ह्या कायता बघूक व्हया... पोराबाळांनी भरलेल्या घरात

ह्या असा अभद्र घडलां ... तां उतरवूचा लागतलां... मनातली मळभ गडद होऊच्या आधी वेळीच साफ करुक व्हई. माका ह्या काय सादा दिसना नाय... पोरा पण भेदरली हतं ... कुणाचा जेवणात लक्ष नाय ... कुणाचो तरी डोळो हा ... या वाड्यावर ... आपल्या सुखावर."

आजीच्या शब्दाक प्रमाण मानणारे तात्या एकाएकी गरजले" कुणाचे डोळे फिरले हत ... !!! कुणाचा मरण जवळ इला हा ….!!!! तां मी बरोबर बघतयं..." तात्या गरजून आल्या पावली न जेवताच घराबाहेर पडले. वेशीवरल्या गूरवाक बखोटीला धरून घेऊन इले. सामानाच्या पोतडीसकट गुरव तातडीनं इलो, सगळो वाडो निपचित पडलो होतों... ... घरचो वासों न वासों शांत उभो होतों... घरची कुत्री आडाजवळ जाऊन बसली होती... कुणी कुणाक एक शब्द बोलूक नाय... गुरवानं घरभर फिरुन अंगारे फुंकून कसलोतरी मंत्र पुटपुटलो. आजीकं कायतां सांगून माडीवच्या फळीवर केळीच्या पानात मूदभर भात, हळद पिंजर भूकटी आणि मुठभर अभिर लावून शेंडीवालो नारळ ठेवलो. सगळ्यांका परसात बोलावणा घाडलां. वाड्यातले सगळेच जिवाच्या भीतीनं परसात जमले. गुरव तात्यांजवळ कयो बोलत होतो. सगळ्यांका परसात बघान म्हणालो"आज सांजेपातूर कुणी घराबाहेर जाऊचा नाय... ह्यो फेरो फार वाईट हां... सगळा परतून लावूक लागतला... सांज झाली की दार लावून घेवा... कितीपण महत्वाचा झाला तरी उद्या

पहाटे कोंबडो आरवल्या शिवाय दार उघडूचा नाय.” अशी सक्त ताकिद देवून गेलो. गुरवाची पाठ फिरल्यावर तात्या आवेगाने आजीला म्हणाले,’’सकाळ पातूर धिर धरा…ज्या कुणी ह्या केला हां…ही करणी त्यावरचं उलटतली… तळतळाट होतलो…मेलो जिवानीशी जातलो…”

सांजेच्या आधी थोडं लवकरच जेवणांवळ आटपून वाड्याचा दार टर्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र… बंद झालां. सकाळपातूर सगळी घरातच होती पण, तात्यांचो विश्वासातलो नोकर दिगू माळावरुन परतलोच नव्हतो. सकाळपातूर ती करणी पुरूचा नि दुसरा तां माडावरुन नारळ उतरवूचा काय तां काम काढलां होतां. आज्येपाठी सगळ्यांका त्याची काळजी. आजेक तर पोरांसारखोच दिगू. दीड दोन वर्षाचो होतो. तात्यांचो हात घट्ट धरून ह्या वाड्यात इलो. काळो सावळो, अंगात फाटकी बंडी, कमरेतल्या करगोट्याक घट्ट केलेली छोटी पॅन्ट. आजेक पोराचो लळो लागलो. लहानाचो मोठ्ठो ह्याच वाड्यात झालेलो. तात्यांचो त्याच्यावर लई जिव. सगळी कामां अगदी न सांगता वेळच्या वेळी करुचो, तात्यांका कसल्याच कामाची कधी आठवण करुन देऊची गरज पडूक नाय. सकाळी परसातली झाडलोटीची सगळी कामा, वाणसामान, गुरां- ढोरां, पत्रा-पोचपावते सगक्याकडे कटाक्षान लक्ष असायचां. वाड्याचो कामाचो भार त्या एकट्यामुळे अगदी हलको होऊन जाऊचो. पायाक नुसती भिंगरी लागलेली. त्याका कधी कुणी शांत बसलेला


बघितला नाय. आज वाड्यावर हि भयाची सावली असताना घरात त्याच्या या न येण्यांन आजीक कसासा झाला. कुणाचा कशात लक्ष नाय. तात्यांचो पण रातभर डोळ्याक डोळो नाय. आजी तर नुसती अंथरुणार पडून ,"दिगू... दिगू... दिगूक घेऊन यवां... दिगूक शोधा..." म्हणून पुटपुटत रवली. घरातले सगळे आजीक शांत करी होते. ही रात्र सहजा सहजी सरुची नाय, घड्याळाकं तर काय धाड भरली होती जाना कोनं...???? घड्याळ बाराचे ठोके देवून जा थांबला तां पुढे चालूकचं नाय, त्या ठोक्यां पाठोपाठ मांजरा दात विचकावत रडू लागली तशी घरच्यांच्या आंगावरुन ही शिरशिरी धावली... व्हरांड्यातल्या झुल्याचो कर्र्र्र्र्र्र्र... कर्र्र्र्र्र्र्र... आवाज... शांतता चिरून डोळे मिटूक देत नव्हतो ... तेवढ्यात धाड ... धाड ... धाड ... धाड ...दारावर थाप पडली. "माझो दिगू इलो . ..." म्हणान आजी दाराकडे धावली. आजेपाठी तात्या धावले. त्यांनी आजेक हाताक धरून मागे खेचले आणि जोरात खेकसले"कायो झाला तरी दार सकाळ पातूर उघडूचा नाय ..." तात्यांकडे बघान आजेन कपाळावर हात मारलो. भिंतीक टेकून जमिनीवर धबकंन बसली.

रातभर सगळ्यांचे डोळे सताड उघडे... पंख्याची घरघर - हदयाचे ठोके मोजीत व्हती... रातभर ह्योच खेळ... म्हणता म्हणता अचानक झुल्याचो कर्र्र्र्र्र्र्र... कर्र्र्र्र्र्र्र... आवाज कानाजवळ येईनासो झालो .... पंख्याची घरघर थांबली ... घड्याळ चालू

झाला ... चारचे चार ठोके पडले ट्यंग ... ट्यंग ... ट्यंग ... ट्यंग ... तेवढ्यात कोंबडो ," काँ.. क…काँक…. कँक…" एवढ्या जोरानं ओरडलो की सगळे दचकान अंथरुणातून ताडकन उठान बसले. तात्या आणि आजी पाठोपाठ अख्खो वाडो दारापाठी जमलो. तां सागवानी दार, त्यावरची लाकडी कडी, त्या पाहाटेच्या अंधारात आजीनं हाती घरलेल्या कंदिलाच्या उजेडात तात्यांकां स्पष्ट दिसली, तात्यांनी नजरेचो एक कटाक्ष आजीकडे टाकलो... एक जोराचो श्वास उरात भरलो ... आन दाराची कडी सरकवून दार जोरान बाहेर ढकललां. टर्रर्रर्रर्रर्रर्रर्र... जस्सा दार उघडला … तशी थंड वाऱ्याची झुळूक सर्रर्रर्रर्रर्र... सर्रर्रर्रर्रर्र... करत वाड्यात घूसली…वाऱ्याचा वेगानं सगळयांचे डोळे मिटले... इतको त्या वाऱ्याचो वेग... ठापकन कंदिल पडून जागीच फूटून विझलो…. डोळे किलकिले करून सगळयांनी पहिला .. ... सगळीचं मंडळी जागीच थबकली … कुणाचोच पाय उंबरठ्या बाहेर पडूक नाय… इतक्या थंड वाऱ्यावर तात्यांच्या कपाळातून घामाचे टप … टप … दोन थेंब जमिनीवर पडले….आजीनं पदराचा बोळकां तोंडात कोंबला…डोळे विस्फारुन सगळी परसात पाहू लागली…सुन्न नजरेनं … नि:शब्द देहानं… परसात आक्रीत घडला होतां…. तुळशी शेजारचा अंगण लाल रंगानं रंगला होतां… करणी उलटली होती… गुरवाचा म्हणणा खरा ठरला होता ... ह्यो परसात रक्ताचे उलटे करुन … त्या रक्ताच्या थारोळयात … डोळे हे आभाळात

चढवून... एका हातात अभिर फासलेल्या नारळाची शेंडी धरुन...मान मोडून... तोंडाचो आ वासून...दिगू पडलेलो होतो. निश्चल... निपचित...

# मल्लमा




मल्लारण्याच्या कड्यावरुन कोसळणाऱ्या धबधब्या शेजारी शरण्यला काजव्यांसारखा मंद प्रकाश जाणवला. त्या प्रकाशाचा

मागोवा घेताना त्याला काहीच अंतरावरच एक गुहा दिसली. गुहेपाशी जाताच आत दूरवर प्रकाशाचा अंधुक ठिबका दिसू लागला. रात्रीच्या गहिऱ्याअंधारात गुहेतून बाहेर पडणारा हा प्रकाश शरण्यला त्या गुहेत आकर्षित करण्यासाठी पुरेसा होता. अशी एक गुहा इथे उंचावर आहे, पण सापडत कुणालाच नाही, असे तो गावातल्या थोरा-मोठ्यांकडून ऐकून होता. आजवर अनेकदा इथवर येऊन अमावस्येच्या इतक्या रात्री उलटून गेल्या, पण त्याला ती गुहा इथे कधीच दिसली नव्हती. आज त्या मिणमिणत्या प्रकाशामुळे ती गुहा जरा स्पष्टच दिसत होती. अमावस्येच्या रात्री अरण्यात मिळणाऱ्या आयुर्वेदीक जडीबुटी शोधता शोधता तो या गुहेपाशी येऊन पोहोचला होता. गावातल्या कुणीही इतक्या उंचावर येण्याचा कधीच प्रयत्न केला नव्हता. गुहेत खुप आत फक्त ‘आई मल्लमाची’ उग्र चेहऱ्याची सुवर्ण मूर्ती आहे, आई अरण्याचं रक्षण करते, अशी दंतकथा मात्र गावभर अबाल-वृद्धांपर्यंत प्रसिद्ध होती…

‘आई मल्लमा’….

अरण्यात उंच डोंगरावरच्या गुहेत एक साध्वी युगानुयुगं तपश्चर्या करत होती. तिच्या तपोबलाने डोंगरावरची आणि आरण्यातली भूमी सिद्ध झाली. अनेक दुर्मिळ औषधी वनस्पतीही रुजल्या, जिवंत झाल्या. आजूबाजूच्या गावक-यांना उपजीविकेसाठी ह्या अरण्याचाच एक मोठा आधार होता. दूरवरुन

लोक या सापडणाऱ्या दैवी, औषधी वनस्पती, औषधी मुळं, फळं गोळा करण्यासाठी इथवर येत. अनेक रोग, व्यधी मुक्त झाल्यावर आई मल्लमाला मनोमन हात जोडून धन्यवाद देत. अचानक काही वर्षातच अरण्यात मल्ल नावाचा तांत्रिक आपला तळ ठोकून राहू लागला. त्याच्या जादूटोण्याला घाबरुन इथं येण्याचं धाडस दिवसाही कुणी करत नसे. तंत्र आणि असुरी विद्येत निपूण असा हा मल्ल अघोरी कृत्य करण्यातही तरबेज होता. संपूर्ण अरण्याला, अरण्यातल्या प्रत्येक झाडं, वेली, फळं, फुलं यांना त्याने आपल्या तंत्र- मंत्राने आपल्या अधीन केलं होतं. रात्री अरण्यात एकट-दूकटं कुणी सापडलं तर त्याचा हमखास बळी जायचा. त्यावर अघोरी विद्येचा प्रयोग करुन ते प्रेत झाडाला टांगलेलं सापडायचं. त्यातूनच काही झाडं नरभक्षीही झाली, अख्खीच्या अख्खी माणसंच गिळून टाकायची. नरसंहाराने मातीत एक प्रकारचं विष पसरलं, औषधी वनस्पतींचाही गुण येईनासा झाला. गावोगावी रोगराई पसरली, माणसं किड्या-मुंगीसारखी मरायला लागली. अरण्य आणि शेजारची इतर गावे निर्मनुष्य झाली.

तांत्रिकाला आता बळी देण्यासाठी देह मिळेनासा झाला, तशी त्याची अघोरी विद्या खुंटली. तंत्र विद्येने त्याने डोंगरावरच्या गुहेत एक मानवी देह आहे हे जाणले. त्या देहाच्या शोधात तो त्या गूहेच्या द्वारापाशी आला. डोंगरावरचा धबधबा खळाळून वाहत होता. त्याच्या चेहऱ्यावर सावज सापडले असा असूरी उन्माद झळकला.

दबक्या पावलाने तो हळूच गुहेत शिरला... गुहेत किर्र अंधार.... पायाखालचा चर्र चर्र पाचोळा तुडवत राहीला... बराच वेळ झाला...अंधार गडद होत गेला. गुहा खुप खोल गेले तरी संपेच ना... तांत्रिक प्रचंड संतापला, त्याला आवेग आवरेनासा झाला. त्याच्या दमलेल्या श्वासाचा धपापलेला आवाज गुहेत निनादू लागला. तेवढ्यात त्याला समोर मिणमिणता प्रकाश दिसला. दगडी दिवा चिरंतन तेवत होता. त्या मंद तेवणाऱ्या दिव्याजवळ जाता जाता तो प्रकाश हळूहळू गहीरा होत गेला. आता तो एकच दगडी दिवा अख्खी गुहा उजळून टाकण्यासाठी पुरेसा होता. त्या दिव्यात त्याला उजळताना दिसली ती तेजस्वी साध्वी. दिव्याजवळच्या दगडी चौथऱ्यावर सिद्धासनात बसलेली. साधारण पाच फुटाचं दिव्य तेजोमय आभामंडल तिच्या भोवती पसरलेलं, प्रसन्न मुखमंडल, डोळे मिटून तपश्चर्या करताना तिच्या ललाटावरचं तेज, सहस्त्र सुर्य एकाच क्षणी उगवल्याचा आभास निर्माण करत होतं. रेशमी केसांच्या काळ्याभोर, लांबसडक बटांनी संपूर्ण शरीर झाकलं होतं. तांत्रिकाचा चेहरा खुलला, त्याला मनोमन आनंद झाला. त्याला बळी देण्यासाठी आज मानवी देह दिसला होता. क्षणाचाही विलंब न करता त्याने मंत्र शक्तीने तिला वश करण्याचा प्रयत्न सुरु केला. पण या वशीकरणाचा साध्वीच्या आभामंडलावर किंचितही परिणाम झाला नाही. मंत्र-तंत्राचा प्रयोग फसल्यावर चिडून कुऱ्हाडीने वार करण्यासाठी तो पुढे सरसावला. साध्वी

ध्यानस्थ बसलेल्या चौथऱ्यापाशी उभा राहीला. साध्वीच्या मानेवर फिरवण्यासाठी त्याने प्रचंड आवेगाने सपकन कु-हाड उगारली... तोच एक जोरदार वाऱ्याचा झोत त्याच्या अंगावर उसळून आला...तांत्रिक दोन पावलं मागे ढकलला गेला ... कू-हाड हवेतल्या हवेत उडून गेली... दगडी दिवा विझला... गुहेत पुन्हा गर्द अंधार कोंडला... यात क्षणभरच ओसरला असेल ... तेवढयात साध्वीने ताडकन डोळे उघडले. तिच्या दोन्ही डोळयातून एका अनामिक ऊर्जेचा स्रोत बाहेर पडला. तांत्रिक जागीच खिळला. तिची नजर समोर उभ्या तांत्रिकावर स्थिरावली. त्याची दुष्कर्म तिच्या मनपटलावर अधोरेखीत झाली. तिच्या डोळयांत अंगार पेटले. आभामंडल लालेलाल झालं. गुहेत प्रचंड उष्णता निर्माण झाली.

तांत्रिकाला उष्णतेनेच आपली राख होईल अशी भीती वाटली. साध्वीचं हे ऊग्र रुप पाहूनच तांत्रिक गर्भगळीत झाला... त्याच्या शरीरातला उद्वेग एकाएकी नाहीसा झाला... मृत्यू ...भयाण मृत्यू ... डोळयासमोर उभा ठाकला. साध्वीच्या केशबटा जमिनीवरून सरकत सरकत तांत्रिकाच्या पायापर्यंत पोहोचल्या. त्याला काही समजायच्या आत पायापासून सरकन चढून चेहराभर पसरल्या. बटांनी तांत्रिककाचे संपूर्ण शरीर वेढून घेतले. नाकावाटे आत गेलेल्या बटा, कानावाटे बाहेर येऊ लागल्या. तांत्रिकाच्या कर्कश्य आरोळया गुहेत घूमू लागल्या. साध्वीच्या बटांनी त्यांची

पकड घट्ट केली.... रक्ताच्या शिंतोड्यांची गूहा लालेलाल झाली ... त्यातच तांत्रिक जमिनीवर कोलमडून पडला. बटा नखशिकांत रक्ताळल्या आणि गुहेत एका दूष्ट प्रवृत्तीचा विनाश झाला. तेव्हापासूनच मल्लाचा वध करुन तपस्वी-साध्वी"आई मल्लमा" झाली. गुहा एकाएकी अदृश्य झाली. आयुर्वेदीक वनस्पती फक्त अमावस्येच्या रात्रीच जिवंत दिसू लागल्या.

त्याच औषधी वनस्पतीच गोळा करता करताच अमावास्येच्या रात्री शरण्य त्या गुहेपाशी येऊन ठेपला होता.

कोसळणाऱ्या धबधब्याचा आवाज कानाला दडे बसवणारा होता. गुहेतला अंधूक प्रकाश शरण्यला आत गुहेत आकर्षित करत होता. त्या प्रकाशाकडे पाहून गुहेबद्दल वेगळंच कुतूहल त्याच्या मनात निर्माण झालं. त्या प्रकाशाचाच मागोवा घेण्याची दुर्दम्य इच्छा त्याच्या मनात निर्माण झाली. त्याची पावलं त्या प्रकाशाच्या दिशेने झपझप पडायला लागली. धबधब्याचा आवाज आता बराच कानामागे पडला होता, त्या जागी पावलांभोवतीचा सूकून निष्पर्ण झालेला पाचोळा चर्र चर्र आवाज करुन फेर धरत होता. पावलागणीक गुहेतला अंधार अधिकाधिक गडद होत होता. चालता चालता शरण्यचं मन एकाएकी विचाराधीन झालं. कुणालाही कधीच न सापडणारी ही अदृश्य गुहा त्याला आज कशीकाय सापडली? ह्या प्रकाशाची इतकी अनाहूत ओढ का निर्माण व्हावी? गावकऱ्यांची ती दंतकथा खरी असेल का? आणि

असलीच तर मल्लमेची गुहेतली सुवर्ण मूर्ती आत नक्की असेल का? असेलच तर कुठे असेल? अशा अनेक प्रश्नांची जळमटं बघता बघता त्याच्या मनात घर करु लागली. पावलांनी एकाएकी वेग घेतला, विचार मंथनात सुद्धा पावले झपझप चालत होती. आता तो बरंचसं अंतर कापून आत आला होता. चालून चालून पायात गोळे येऊ लागले. पण, गुहा काही केल्या संपत नव्हती. आपण ही गुहा शोधली हा गर्व त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. त्या मी पणाच्या गुर्मीत तो ती सुवर्ण मूर्तीही नक्की शोधून काढू शकतो, असा अहंकारही त्याच्या मनात निर्माण झाला.

या साऱ्या विचारांच्या प्रवाहात अचानक चालता चालता तो अंधूक प्रकाशही एकाएकी दिसेनासा झाला. पायाच्या दूखण्याकडे दुर्लश करुन तो भरभर पुढे जाऊ लागला. अंधारात समोरचं काहीच दिसेनासं झालं. गडद झालेल्या काळोखात शरण्य धापकन ठेच लागून पुढे पडला... डोकं दगडावर दणकन आदळलं... शुद्ध हरपली...हाता-पायाला मुंग्या आल्या सारखं झालं. भानावर आला तेव्हा उजव्या हाताला एक रेशमी स्पर्श जाणवला. त्याच हाताने जरा चाचपडून पाहीलं तर त्या केसांच्या रेशमी बटा होत्या...त्या केसांच्या बटांनी त्याचा उजवा हात घट्ट बांधून ठेवला होता....आपल्या सोबत हे काय होतयं याची त्याला पुसटशीही कल्पना येत नव्हती... मनातल्या अनेक प्रश्नांची उकल काही

केल्या होत नव्हती... डोक्यातल्या विचारांच्या चिंध्या इतरत्र उडू लागल्या....त्या गोळा करुन त्यानं त्याचं मन शुन्यात एकवटलं.

गुहेतला दगडी दिवा एका झटक्यात प्रज्वलीत झाला...त्याने अर्धवट डोळे उघडून तो दिवा पाहीला...त्याची किलकिली नजर त्या दिव्यावर स्थिरावली. गुहेतल्या प्रत्येक कडे-कोपऱ्यात त्या दिव्याचा प्रकाश भरुन राहीला. क्षणभरात उजळलेल्या या प्रकाशाने शरण्यचेही डोळे ताडकन उघडले. डोळ्यांपुढे घडून गेलेले भूत-वर्तमानातले अनेक प्रसंग उभे राहीले. प्रत्येक अमावस्येला गोळा केलेल्या औषधी वनस्पतींचा तो कसा गैरवापर करत होता, त्या औषधी वनस्पतींपासून विष तयार करुन गावोगावी फिरुन, सावज साधून, एकांतात त्याचा कसा बळी देत होता, साऱ्या साऱ्या घटना एकपाठोपाठ एक ठळक झाल्या. त्या घटनांची एक साखळीच तयार झाली.

आता शरण्यच्या मनात ही गुहा दिसण्यामागचं खरं कारण स्पष्ट झालं होतं. मनातल्या अहंकाराची जागा आता जिवाच्या भीतीने व्यापली होती. तिथून लवकरच पळ काढण्याच्या हेतूने तो पायाला हिसका देत उठू लागला. त्याने उठताना पाहीलं तर तो त्याच चौथऱ्याला ठेचकळून पडला होता ज्या चौथऱ्यावर दंतकथेतली साध्वी तपाला बसली होती. उठताना..."आई गंSSS"...उजव्या हातातून एक कळ मस्तकात गेली....हा विव्हळला...तसा त्याला आपला उजवा हात कुणी तरी धरुन ठेवल्याची जाणीव झाली. त्या

हाताकडे लक्ष जाताच … तो दचकला….हाताला केसांच्या बटांनी करकचून जकडले होते. आपला हात सोडवून घेण्याचा त्याने अथक प्रयत्न केला. त्यात काळया, रेशमी बटांचा वेध घेताना त्याने पाहीलं ते गुहेत पसरलेलं वर्तुळाकार दिव्य आभामंडल… ते पाहून तो चमकला … तेवढ्यात त्याच्या हाताला एक जोराचा झटका झटका बसला आणि तो त्या आभामंडलात ओढला गेला. त्या आभामंडलात जाताच त्याचे डोळे विस्फारले…. अंगावरुन विजेचा प्रवाह संचारुन गेला… शरीरभर सरसरुन रोमांच उठले… त्याचा सत्य परिस्थितीवर विश्वासच बसेना…. त्याच्या समोर त्याच आभामंडलात सिद्धासनात ध्यानस्त बसली होती ती… साध्वी… अत्यंत दिव्य…तेजस्वी … सहस्त्र सुर्यतेज ललाटी घेऊन. तिच्या बंद डोळयातूनही तिच्या तपोबलाचे तेज बाहेर डोकावत होते… त्याचीच ऊर्जा शरण्याला आरपार भेदत होती … तिच्या मऊ, रेशमी काळया केशबटा शरीरभर पसरल्या होत्या.

त्याने केलेली दूष्कर्म एका पाठोपाठ एक त्याच्या दृष्टीपटलावरुन सरसर सरकू लागली. आपण औषधी वनस्पतींचा केलेला आयोग्य वापर… आयुष्यभर केलेले अनेक अपराध… निष्पाप लोकांचे घेतलेले जीव, याचीच ही शिक्षा आहे, हे त्याला कळून चूकले होते. आभामंडलाचा गडद लाल रंग, गुहेत वाढणारी उष्णता या साऱ्या संकेतांनी आपला मृत्यू जवळ आला आहे, हे त्याला आता नीटसे समजले होते.

हातावरच्या केशबटा सर्र सर्र सरकू लागल्या, खांद्यापासून डोक्यापर्यंत....पायापासून कमरेपर्यंत... सळसळू लागल्या. शरण्यचा घसा सुकला... तोंडातून शब्दही बाहेर पडेना... पाय लटपटायला लागले... डोळ्यापुढे फक्त लालेलाल प्रकाश पसरला.... ..शरण्यला काही कळायच्या आतचं... बटांनी झटक्यात आपली पकड घट्ट केली... एक कर्कश्य किंकाळी गुहेत घूमली... बटांमधून रक्ताचे शिंतोडे अख्या गुहेत उडाले... उडालेल्या रक्ताने दगडी दिवा विझला... आभामंडल हळूहळू लोप पावलं ... एक निरव शांतात पसरली ... पुन्हा एकदा एका दुष्ट प्रवृत्तीचा नाश झाला... जीवनदान देणारी आयुर्वेदीक औषधी लोकोपयोगासाठी पुन्हा चिरंजीवी झाली...

आणि ... गुहा...

गुहा...

पुन्हा अदृष्य झाली.

# चेटकी




चंद्रमौळीच्या अरण्या शेजारी आसलेल्या आदिवासी पाड्यात एका नवशिक्या पोलिस पाटलाची नियुक्ती झाली. उंचपुरी, अत्यंत

कर्तबगार आणि धडाडीचं व्यक्तिमत्व. दुपारच्या कडकडत्या उन्हात इतकी वर्षे या पाड्यावरचा पोलिस ठाण्याचा बंद दरवाजा आज काय तो उघडला. पाड्यावरची दोन चार मंडळी लागलीच पोलीसाच्या सोबतीला आले. 'पाड्यावर पोलीस आले, हाच काय तो आमचा आधार' असं मानून साफसफाईला सुरुवात झाली. पोलीस पाटील चेहऱ्यावरून इतक्या लांब, ते ही अरण्या शेजारी आणि आदिवासी पाड्यात काम करायला मनापासून तयार नव्हता असंच वाटलं. तरीही नव्याची नवलाई म्हणून मनावरची आणि ठाण्यातली सगळी जाळीजळमटं काढून पोलिस नव्या उमेदीनं कामाला लागला. गावक-यांना भेटून काही तक्रार -तगादा आहे का? ते तपासू लागला. गावात मोजून पन्नास एक झोपड्या. पडक्या माळावर नजर संपेपर्यंत पसरलेली शेती. शेतीच्या सीमेवरून आपापसात काही भांडण व्हायची. पण, पोलिसाचा शब्द कुणी कधी पडू दिला नाही. असेच दिवस जात होते. पोलिसही हळू हळू आपल्या कामात रुळत होता. अचानक एक दिवस पाड्यावरल्या दोन चार जणांनी पोलीस ठाण्याचा दरवाजा धाडकन आपटला. रडकुंडीला येऊन पोलिसाला म्हणाले"जित्या सापडेना व्हं….!!" धबकन ठाण्यातच बसले … पोलिसाला काही सुचेना …"आपण आता शोध घेऊ" … ताडकन उठला. गावकरी म्हणाले,"पाक सगळं धुंडाळलं … माळरानापातूर अरण्यापर्यंत… काय बी गावलं नाय." सगळेच कपाळाला हात लावून बसले. त्या नंतर लगेच

दुसऱ्याच दिवशी गावक-यांना उघड्या पठारावर स्मशानाशेजारी मानवी खोपडी आणि हाडं सापडली. या घटनेने पाड्यावर एकच खळबळ उडाली, काल रात्री पासून पाड्यावरचा जित्या गायब होतो काय..., आन् आज ही हाडंकुडं सापडतात काय..., यात सगळ्या गावक-यांचे एकच म्हणणे पडले,"या गावात जे काही वाईट वंगाळ व्हतं ते त्या चंद्रमौळी अरण्यातल्या टेकाड्यावरल्या चेटकीणी मुळं." पोलीसाला तर सगळ्या गावक-यांनी चेटकीणीबद्दल सारं घटित अघटित सांगून सांगून हैराण केलं होतं. त्यालाही आता गावात काहीतरी विचित्र जाणवत होतं. पूर्वीचं वातावरण आता गढूळ झालं होतं. त्या रात्री पोलिसाला जरा निघायला उशीरच झाला. कुलूप लावून ठाण्यातून बाहेर पडताना त्याला एका झोपडीबाहेर चारपाईवर एक हाडकूळा माणूस झोपलेला दिसला. अंगावर चिखलाचा हा रापलेला थर, केस त्या चिखलाच्याच लगद्याने सुकून घट्ट झालेले. पोलिसाला चर्रर... चर्रर.... पाचोळ्यात पावलांचा आवाज आला, हा प्रकार काहीतरी वेगळा आणि विचित्र जाणवला, तो तिथेच एका झाडापाठी लपून राहीला. त्याची नजर त्या चारपाईवर चिखलाने माखलेल्या माणसावर स्थिरावली. किर्र्र् काळोखात एक साधारण ३-४ फुटाची काळीकुट्ट, केसं विस्फारलेली बाई त्या माणसाभोवती आली. तिला पाहताच झोपलेला माणूस दचकला, तडफ़डला पण त्याला उठताच येईना. अंगातली सगळी शक्तीच संपल्यासारखी. लाल

भडक डोळे वटारून ती बाई म्हणाली,''चल संग …. तुझा बळी द्यायचाय…. तुझा देव बोकड मागतू…आन् माझा मानूस'' काहीच क्षणात तिथे एक कोल्ह्यासारखं दिसणारं काळंबेरं मोठ्ठालं कुत्र आलं. त्या बाईने काहीबाही मंत्र पुटपुटला आणि झटक्यात तिने स्वतःचा आणि त्या माणसाचा आकार सुक्ष्म केला. उडी मारून त्या कुत्र्याच्या पाठीवर बसून अरण्याच्या दिशेने धाव घेतली, त्यांच्या पाठोपाठ पोलिसही धावला... त्याच्या श्वासाची गती वाढली... ... त्या श्वासाचा आवाज तिच्यापर्यंत पोहोचला ... तिनं मागे वळून पाहिलं ... आपल्यापाठी कुणीतरी धावतयं हे त्या चेटकीणीला दिसलं असावं, ती जागीच थबकली, तिला पाहून पोलीसही डचमळला... दोघांनी एकमेकांना पाहिलं ... तेवढ्यात त्या चेटकीणीने... … एक टोकधार चाकू गपकन पोलीसाच्या कपाळाच्या दिशेने फेकला… सर्ररर्रकन…

तो आवाज ऐकून पोलिस दचकून उठला, सगळ्या अंगाला डबडबून घाम आला होता, घसा कोरडा पडला होता. त्या स्टेशनातल्या काळयाकुट्ट अंधारात छताला फक्त पंखा गर...गर ... फिरत होता. क्षणभर त्याला आपण कुठे आहोत हे कळेच ना ... पोलिस भानावर आला तेव्हा त्याला समजलं … हे सगळं स्वप्न होतं तर…आज तो ठाण्यातच झोपला.

दुसऱ्या दिवशी तीच शेतीच्या सीमेवरून भांडणं आणि त्याच त्या चेटकीणीबद्दल भयावह कथा ऐकून त्याचा जीव मेटाकुटीला

आला. सगळयांना आपल्यापरीने समजावून त्याने ठाण्यातून परतवून लावले. आता तरी शांत बसू म्हणून जरा पहुडला ... डोळा कधी लागला कळलंच नाही. जाग आली तेव्हा रात्रीचे किती वाजले होते कुणाच ठावूक, चहूकडे किर्ररsssss अंधार दाटून भरला होता. ठाण्यातून घराकडे निघायला आजही पोलिसाला बराच उशिर झाला होता. पोलिस हातात बॅटरी धरुन वाट शोधत पुढे पुढे जात राहीला, मनात कालच्या स्वप्नाचाच विचार. पायाला गती दिली तरी ते स्वप्न काही केल्या पाठलाग सोडीना… सारखा तो फेकलेला चाकू कुठुनही सर्ररकन येईल असं वाटत राहीलं….मनात एक प्रकारची भिती दाटून राहीली…नदीकिनाऱ्यावरुन चालताना बूट चिखलात रुतू लागले. चपाक ... चपाक ... त्या चिखलात चालणे कठीण होऊ लागले.”आई ... गं” काळोखात दगडाला ठेच लागून धाबकन पडला, तोच तळपायातून कंबरेत जोरदार कळ गेली, सगळा चिखलगाळ अंगभर लागला. अंगावरचे कपडे जड झाले. कसाबसा उठला पाय मोडत चालून एका घराचा आडोसा घेतला. घराबाहेरच्या चारपाईवर बसला. एक थंड वाऱ्याची झुळूक चिखलाने माखलेल्या अंगावरुन सळसळून गेली. डोळे आपसूक मिटले गेले, अंग चारपाई स्वाधिन झालं. आता उठायची इच्छा असूनही उठता येईना इवढं शरीर पार थकून गेलं…वाऱ्यावर चिखल अंगावरच सुकून अंग थंडगार झालं ... ... ... .तेवढ्यात

भुर्र्र्र्र्र् .. ... वाऱ्याच्या वेगात ती आली, काळीकुट्ट, केस वाऱ्यावर भुरभूरत टाकून समोर उभी राहीली आणि म्हणाली, "चल संग .... तुझा बळी द्यायचाय.... तुझा देव बोकड मागतू...आन् माझा मानूस" हे शब्द पोलिसाच्या कानात कुणीतरी गरम तेल घातल्यासारखे घूसले...डोळे खाडकन उघडले ... काही करायच्या आत त्या विचित्र दिसणाऱ्या बाईने मंत्र शक्तीने आपला आणि पोलीसाचा आकार सुक्ष्म केला, जवळच उभ्या, कोल्ह्यासारख्या दिसणाऱ्या काळयाकुट्ट कुत्र्यावर बसून दोघं सुसाट अरण्यात शिरली.

पोलिसाला काहीच कळत नव्हतं, आपल्या बरोबर काय चालू आहे? आपण कुठे आलोय? मिणमिणत्या डोळयांनी पाहिलं तेव्हा दिसलं अरण्यात दूर कुठेतरी एक टिमटिमणारी शेकोटी पेटताना दिसली. शेकोटी जवळ जाताच कुत्रा एकाएकी थांबला, क्षणार्धात त्या सूक्ष्म बाईने आपले खरे चेटकीणीचे रुप धारण केले. साधारण आठ दहा फूट उंच, घुबडासारखं बाकदार नाक, अर्धे-अधिक कवटीच्या खोबणीत खोवलेले लालेलाल डोळे. सुरकुतलेला गळा. हातभर लांब नखं, पायापर्यंत सुळसुळणारे पांढरे केस... हे रुप पाहूनच पोलीसाचा थरकाप उडाला, अंगावरचे केस उभे राहिले, तोंडाचा आ... वासला, घसा अगदी गळयापर्यंत सुकला... तोंडातून शब्द फुटेनासा झाला, अंगातून सगळीच शक्ती

गळून पडली... अंग गपगार पडलं...पायाची कळ ठणकावून मस्तकात जाऊ लागली.

अरण्यात काय होणार याचा मागमूसही पोलिसाला नव्हता. शेकोटी भडकली ... चेटकीण किंचाळली ... हपापलेला कुत्रा पोलिसाकडे नजर रोखून पाहू लागला. बळी द्यायचा म्हणून चेटकीणीने तिच्या पोतडीतून धारधार चाकू काढला. कुत्रा आणि चेटकीणीची नजरानजर झाली. आपल्याला आज सावज मिळणार म्हणून कुत्र्याच्या तोंडून लाळ गळू लागली. पोलीसाचा बळी घेण्यासाठी कुत्रा आणि चेटकीणीत चुरस निर्माण झाली. शेकोटीच्या बाजूला निपचित, असहाय पडलेल्या पोलीसाचा बळी देण्यासाठी चेटकीन चाकू घेऊन पुढे सरसावली. डोळे किलकिले उघडून पोलीस क्षणभर भानवर आला... त्याने समोर सगळं पाहिलं. चाकूने ती सपकन पोलिसाचा गळा चिरणार हे दिसताच कुत्र्याने पोलीसावर झडप घातली, वारा जोरात सरसरला.... अंगात उसनं बळ आणून पोलीस हाताच्या कोपराला जोराचा हिसका देऊन शेकोटीपासून चार हात दूर सरकला... वाऱ्याचा प्रचंड वेगात शेकोटी उंच भडकली... त्याची झळ चेटकीणीच्या विस्कटलेल्या केसाला लागली... केसांनी चर्ररर्रर्र पेट घेतला...पोलिस जागचा सरकल्याने कुत्र्याची झडप चुकली.... तो थेट चेटकीणीवर जाऊन जोराचा आदळला...चेटकीणीचा तोल गेला... ती कुत्र्याला घेवून शेकोटीत पडली...ज्वाला आभाळभर पसरल्या... आसमंतात

एक जोरदार -हृदयद्रावक किंकाळी आणि कुईईss... कुईईsss ... कुत्र्याच्या रडण्याचा आवाज…कर्कश्य…

.

.

.

दुसऱ्याच दिवशी पोलिस ठाण्यात भेदरलेल्या नजरेने काही गावकरी आले, “साहेब ... लवकर चला ... ते … ते तिथं पठारावर... स्मशानाशेजारी चांगली आठ-दहा फुट लांब हाडं पडल्याती…. हे बी त्या अरण्यातल्या चेटकीचंच काम हाय…”

.

.

पोलीसाने नजर उचलून वर पाहीलं... तेव्हा त्याच्या थकलेल्या चेहऱ्यावर फक्त एक बारीक स्मितरेषा उमटली …

# घुबड




लहानपणापासूनच माझ्या कोकणातल्या न उलगडणाऱ्या रहस्यमयी गोष्टी कानावर पडत पडतच मोठा झालो, म्हणूनच मनावर एक प्रकारचं दडपण होतं, मन अस्वस्थ करणारं, थरकाप उडवणारं त्यामुळेच कदाचित गावी लग्न करायला माझं मन तयार होत नव्हतं, पण घरच्यांच्या आग्रहापुढे मला नमते घ्यावे लागले आणि इच्छा नसून सुद्धा मी गावी लग्न करायला तयार झालो.

मुंबईत स्थायिक होण्यापूर्वी गावी जे काही अनुभवलं त्या अनुभवाचा परिणाम म्हणून गावी जाणे मी कायमचे बंद केले होते,

पण हा विचित्र योग्य जुळून आला आणि गावच्या घरात पाय ठेवणे मला भाग पडले.

त्या जुन्या घरातल्या जुन्या आठवणी मन पोखरून काढत होत्या, भूतकाळ सरला तरी भूतकाळातल्या काही गोष्टी पाठलाग सोडत नव्हत्या, त्यातच हा गावी लग्न करण्याचा विलक्षण योग.

एकूणच मला त्या घरात पाऊल ठेवलं कि खूप अस्वस्थ वाटायचं, माजघरात उभं राहिलं कि पाय तळघराच्या दिशेने कुणीतरी ओढताय आणि ते जमिनीत धसून खोलवर रुतून पडलेयत असं वाटायचं, कानाला दडे बसायचे, हात सुन्न व्हयचे आणि अंगाला दरदरून घाम फुटायचा.

माझं बालपण कोकणातलंच ... कोकण म्हटलं कि डोळ्यांसमोर उभा राहतो तो निळाशार समुद्रकिनारा, किनाऱ्यालगत उभी असलेली नारळी पोफळीची उंचच उंच झाडी आणि त्या समुद्रात हेलकावे खात डोलणारी शिडाची नाव, सारं काही चित्रवत. अशा या निसर्गदत्त कोकणात गावच्या वेशीवर आमचा भलामोठ्ठा प्रशस्त वाडा, चांगल्या वर-खाली मिळून दहा बारा खोल्या, ओसरी ... ओसरीत पितळी झोपाळा... छानच झुलायचा.

वाड्या शेजारीच लागून आमचीही नारळी पोफळीची उंचच उंच झाडं, आम्ही त्याला माडी म्हणत असू, त्या झाडाची पानं वाऱ्यावर सतत सळसळत राहायची. आम्ही लहानपणी माडीवर

खेळायला जायचो. सरसर झाडावर चढायचो. कितीही उन्हाळा असला तरीही शांत आणि थंड वातावरण होतं माडीत. दिवस कधी संपायचा कळायचं पण नाय. संध्याकाळची उन्ह कलली कि किर्रर्र अंधार पडायचा. सगळेच वाड्याच्या दिशेने धाव घ्यायचो. हात पाय धुऊन, देवळाला नमस्कार करून अभ्यासाला लागल्याचो. वरच्या माझ्या खोलीतील प्रत्येक खिडकीतून समुद्र दिसायचा, दूरवर पसरलेला, त्याच्या अथांगतेकडे टक लावून पाहिलं कि क्षितिजावर पृथ्वी संपल्याचा आभास निर्माण व्हायचा आणि रात्रीच्या शांततेत त्याचा तो उथळ लाटांचा आवाज कानात घुमत राहायचा.

वाड्याबाहेर व्हरांड्याला लागूनच एक भाला मोठा प्रशस्त उंबर, दहा माणसांच्याही कावेत न मावणारा, ज्याची मुळ व्हरांड्यातून आत शिरून घराच्या दाराबाहेर रेंगाळणारी, पानांची सळसळ थोडी वेगळीच कानावर पडायची, सगळ्या झाडं झुडपांच्या आवाजात तो सळसळणारा आवाज लक्ष वेधून घ्यायचा, तो तसा मलाच ऐकू यायचा कि इतरांनाही याची उकल काही केल्या होत नव्हती, आवाजाच्या दिशेने वर पाहिलं कि मान मोडून निघत असे इतका आभाळभर पसरलेला, त्याच्या पानांची प्रचंड वर्दळ सूर्यालाही जमिनीचा वेध घेऊ देत नसे.

वाड्यात एकूणच आम्ही वीस-पंचवीस माणसं रहात होतो. गणपती आणि दिवाळी असे दोनच सण असे कि घरची सगळी

मंडळी घरातच असायची. पत्ते गप्पांच्या फडात रात्र सरून जायची. या दोन सणांनाच होतील ती काही जागरणं, लहान होतो तेव्हा काही जाणवत नव्हतं कारण दिवसभर खेळून दमल्यामुळे रात्री लवकर डोळे मिटायचे पण जसे जसे वय वाढत गेले तसं कुतूहलही वाढतच गेलं, मोठ्यांच्या गप्पांचे विषय कळू लागले, अनेक रहस्याचे धागे दोरे सापडू लागले, त्याने एक उत्कंठा दाटून राहिली मनात... ... पूर्वजांच्या भूतकाळाची.

त्या गप्पांमध्येच उकल झाली ती त्या दाराबाहेरच्या सळसळणाऱ्या उंबराची. पणजोबांच्या मुंजीला त्यांनी घराबाहेर सर्वांच्या साक्षीने लावलेला तो उंबर. रुजवला तेव्हा अगदी छोटंसं रोपटं होतं. त्या उंबराच्या झाडाचा उत्कर्ष झाला तसा त्यांचाही झाला. घराबाहेर लावलेल्या उंबराची मुळे दारापर्यंत पोहोचली. पणजोबांचा खूप जीव त्यावर. काम करून थकले कि उंबराला टेकून बसून राहायचे. मनातलं सगळं त्या उंबरालाच सांगायचे. त्यांच्या लग्नानंतर मग पणजीनेही त्या उंबराची मनापासून काळजी घेतली. पणजोबांच्या प्रदीर्घ आजाराने जाण्यानंतर दुसऱ्याच दिवशी दारात त्या उंबराची प्रचंड पानगळ, हा असा सडा पडला होता म्हणे त्याच्या हिरव्या जर्द पानांचा, पाय ठेवायला भुई शोधावी लागेल… एवढा... गर्द ... त्यानंतर त्या उंबराला कधीच ती गोल फळं लागली नाहीत, पण सळसळत राहिला ….अन आजही सळसळतो पणजोबांच्या विरहात … विचित्र …

गप्पांच्या प्रत्येक मैफिलीत हमखास तिचाही विषय निघायचा, प्रत्येक प्रसंगातून तिचा चेहरा माझ्या मनात स्पष्ट व्हायचा, ती आता हयात नसताना तिच्या आणि पणजोबांच्या नावाने अजूनही उंबरा शेजारी दिवा लागायचा . . . . . . आणि तो उंबर तसाच विचित्र सळसळायचा

ती म्हणजे माझी पणजी आजी ...कात्यायनी हनुमंतराव नाईक

माझं पाचवीपर्यंत शिक्षण गावाकडेच झालेलं. मला एवढंच आठवतं मी शाळेत असताना पाहिलं होतं तिला, पणजोबांच्या जाण्यानंतर जरा वेड्यासारखीच वागायची. कसले कसले आवाज काढायची, ओरबाडून काहीबाही खायची, मुलं घाबरतील म्हणून कदाचित घरचे आम्हा मुलांना तिच्या जवळ फिरकूही देत नसत. एकदा दोनदा पाहिल्याची तेवढीच काय ती तिची आणि माझी ओळख.

आमच्या मोठाल्या वाड्याला एक तळघर होतं, सगळं शेतीवाडीच्या सामानाने भरलेलं, तिथं सहसा कुणीही फिरकायचं नाही. पणजोबांनंतर ती तिथेच एकटीच राहायची, कुणी आपणहून जेवण खावणं घेऊन गेल कि शिव्या शाप देऊन हाकलून लावायची. हळू हळू घरच्या सगळयांनीच तळघरात जाणं बंद केलं. ती गेली तेव्हा मी पुढील शिक्षणा निमित्त काकांकडे मुबंईत होतो. तिच्या अकाली जाण्यानंतर तिच्या पिंडाला कावळाही शिवला नाही म्हणे. तो उंबर मात्र दिवसभर तसाच विचित्र सळसळत राहिला. तळघर

साफ करताना तळघरात मानवी मनगट हाड आणि कसल्यातरी तांबड्या पिवळ्या भुकट्या सापडल्या म्हणूनच मोठ्या तात्यांनी तळघर कायमचं बंद केलं आणि कुणालाही तळघरात जाण्यासाठी मज्जाव केला. त्यानंतरच्या शाळेच्या सुट्टीत लहानपणी एकदा लपंडाव खेळताना माझी पावलं तळघराजवळ घुटमळत होती तेव्हा जो अनुभव आला तेव्हापासून मी त्या जागेचा आणि गावच्या घराचा नादच सोडला आणि तडक मुंबईला काकांकडे निघून आलो.

मनावर थोडा ताण दिल्यावर आठवलं लपंडाव खेळताना कुणीही फिरकणार नाही या विचाराने लपायला म्हणून तळघराच्या दिशेने हळूच कडी उघडून त्या लाकडी जिन्या वरून एक एक पाऊल टाकत खाली उतरलो तेव्हा मनात एक वेगळीच अस्वस्थता जाणवली … मन सुन्न करणारी ती निरव शांतता … ज्या शांततेत माझ्या हृदयाच्या ठोक्याचाही आवाज मला ऐकू येत होता, पायाला धूळ माती लागत होती, त्या धुळीचे लोट नाका तोंडात जात होते. तरीही इथे कुणीही शोधू शकणार नाही असं म्हणून उतरलो.

उतरताना हातच्या डाव्या बाजूला लावलेल्या फळकुट्यातून वाकून पाहिलं तेव्हा संपूर्ण तळघर स्पष्ट दिसत होतं. भिंतीला लागून उभे केलेले कुदळी, फावडे, घमेले, खुंट्याला बांधलेली बैलांची वेसण सगळे जागच्या जागी… फक्त धुळीने माखलेले. इथून पुढे

जाण्याआधी अजून थोडं डोकावून बघू म्हणून मी एका बारीक फटीतून डावा डोळा बंद करुन उजव्या डोळयानी पाहिलं

थोडी नजर इकडे तिकडे भिरकावली तेव्हा ती स्थिरावली ती एका पाठमोऱ्या आकृतीवर, ती आकृती पाहून विजेचा प्रवाह शरीरात शिरावा अशी शिरशिरी आली... अंगावर काटा उभा राहिला... मानेवरचे केस ताठ झाले... .

मी समोर पहिले ते विस्कटलेले पांढरे शुभ्र केस. तळघरात खिडकी, तावदाने असं काही नाही त्यामुळे वारं शिरायला जागाच नाही पण तरीही ते केस वाऱ्यावर भुरभुरत होते, डोळे विस्फारून पाहिलं तेव्हा त्या केसांन आडून मानेखाली पाठीवर कसलीतरी गोंदण दिसत होती, नाजूक मनोहर नक्षी नव्हती ती, माझ्या आई-काकूच्या अंगावर देवा धर्मची अनेक गोंदणं पाहिलीत मी, पण हि गोंदण हिंसक, दुष्ट आणि क्रूर, कसलतरी वेगळच .... काय बरं असावं ते हे पाहण्याची इच्छा गडद झाली म्हणून बाजूच्या मोठ्या फळकुटाला पडलेल्या भगदाडातून थोडं आत डोकावू म्हंटलं ....

माझा माझ्या श्वासांवरचा ताबा सुटला आणि मंद श्वासांचा वेग अचानक वाढला, नाकपुडीतून बाहेर पडणाऱ्या हवेच स्पर्श वरच्या ओठाला उष्ण जाणवू लागला, त्याचा आवाज तळघरात घुमला आणि ती आकृती त्या आवाजाच्या दिशेने माझ्याकडे वळली... मी दचकून मागे झालो ... भिंतीला धपकन पाठ टेकली ... तोच

पायखालचं फळकुट खाट्कन तुटलं ... माझा तोल गेला आणि मी जिन्यावरून गडगडट थेट खाली तळघरात ...

डोळे उघडले तेव्हा अंग तापाने फणफणत होतं, मला उठायलाही जमत नव्हतं, इतका अशक्तपणा मी या पूर्वी कधीच अनुभवला नव्हता, घरची सगळी मंडळी माझ्या दिवाणाच्या आजूबाजूला काही तरी कुजबुजताना ऐकू आली … “बाधा झाली असतली," …”अंगावरून उतरवूक व्हाया" अस काहीसं … पण त्या साऱ्यांची नजर माझ्या तळपायावर, माझा यावर फारसा विश्वास नव्हता तरीही मी मनातून खूपच घाबरलो होतो म्हणूनच तोंडातून ब्र ही निघाला नाही आणि मी स्वतःहून कुणाला काहीही सांगितलं नाही, पण मला खूप चांगलं आणि व्यवस्थित आठवतंय माझा तोल जाण्या आधी मी ते गोंदण स्पष्टपणे पाहिलं होतं

उग्र काळया रंगाचं, गोल गोल डोळयाचं … माझ्याकडेच नजर रोखून पाहणारं …. अपशकुनी … घुबड

हो घुबडच होतं ते …

या विचारात नजर पायाच्या तळव्यांवर गेली तेव्हा पहिली ती धुळ म्हणून पायाला लागलेली तीच तांबडी पिवळी भुकटी

अंगात ताप असूनसुद्धा डोळयापासून पायाच्या नखापर्यंत अंघोळ केली.

कोकण म्हंटल कि, या साऱ्या वितुष्ट आठवणी मनातून काही केल्या पुसल्या जात नव्हत्या आणि त्यातच घरच्यांचा हा वाड्यात लग्नाचा अट्टहास.

कामानिमित्त मुंबईत स्थायिक झालो तेव्हाही काही गोष्टी कानावर पडतच होत्या पण मी दुर्लक्ष करत होतो.

मी घरात पाऊल ठेवायच्या आधी लग्नासाठी घरच्यांनी विधिवत सगळं घर स्वच्छ आणि पवित्र करून घेतलं होतं. हळद, लग्न जरा गडबडीतच पार पडलं. आल्यापासून जरा म्हणून उसंत नाहीच.

आजचा दिवस तसा मंगलमय, घराला झेंडूची तोरणं, दारात केळीचे खांब, सगळे आनंददायी वातावरण, आज सत्यनारायण होता, लग्नानंतरचा माझा पहिलाच सत्यनारायण. लग्नाच्या धावपळीमुळे पहाटे उठायला थोडा उशिरचं झाला. उठल्या उठल्या पाहिलं तर अनघा दिवाणखान्यात कुठेच दिसत नव्हती. अनघा माझी बायको... गेले एक सहा महिनेच आम्ही एकमेकांना ओळखत होतो, ऑफिसची ओळख ... ओळखीची मैत्री ... मैत्रीचं प्रेम ... आणि त्यानंतर हे असं गावी आमचं लग्न, सगळं काही शुभस्य शीघ्रम. माझ्यासारखीच या साऱ्या लग्न सोपस्कारांमुळे तीही दमलीच होती. मी सगळं आवरून सदरा घालून लाकडी जिन्यावरून धडधडत खाली उतरलो. घरातल्या नातेवाईक मंडळीतही माझी नजर फक्त अनघालाच शोधत होती. आपण

लवकरच हे सगळं आटपून मुंबईला जातोय हि बातमी मला तिला सांगायची खूप घाई झाली होती. देवघरात पाहिलं तर गुरुजी पूजा बांधून पूजेच्या सामानाची मांडामांड करत बसले होते. संपूर्ण देवघर आणि माजघरात दरवळत होता तो धूप दीपाचा मन प्रसन्न करणारा दरवळ, त्याला मधेच छेद देत होता तो माझ्या आईने केलेल्या प्रसादाच्या शिऱ्याचा सुवास.... प्रसादाचा शिरा करावा तर तो माझ्या आईनेच यावर आज पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झालं. या अशा साऱ्या वातावरणामुळे देवावरचा माझा विश्वास पुन्हा एकदा दृढ झाला आणि मी सोवळं नेसून पूजेला बसायला तयार झालो, तेवढ्यात अनघा हिरवा शालू नेसुन समोर आली. अगदी तशीच जशी मला पहिल्या भेटीत आवडली होती. काळे लांब रेशमी केस, त्यावर सोडलेले मोगऱ्याचे गाजरे, रुंद कपाळ त्यावर चंद्रकोर, सरळ साधे नाक त्यात सफेद मोत्याची नथ आणि सफरचंदासारखे गुलाबी गाल. पूजेला शेजारी बसली तेव्हा तिच्या केसातला मोगरा मला मोहात पडत होता. तिच्या सौंदर्यापुढे गुरुजींचे मंत्रोच्चार कानामागे पडत गेले आणि अचानक ... तो उंबर सळसळला, तेव्हा भानावर आलो. पूजा केव्हा संपली माझं मलाच कळलं नाही. गुरुजींना लवकर मोकळं करावं म्हणून मी दक्षिणा देऊन नमस्कार केला. तेवढ्यात अनघा गुरुजींना देण्यासाठी प्रथेप्रमाणे शिधेची थाळी घेऊन आली. गुरुजींना थाळी सोपवून नमस्कारासाठी खाली वाकली तेव्हा तिच्या पाठीवरून सगळे गाजरे तिच्या डाव्या

खांद्यावरून खाली सरकले, त्यातले काही मोगरे निखळुन खाली जमिनीवर पडले. गजऱ्यां पाठोपाठ सरकले ते तिचे काळे लांब रेशमी केस माझी नजर तिच्या मानेभोवती असलेल्या मी लग्नात बांधलेल्या मंगळसूत्रावर स्थिरावली. त्या मंगळसुत्रा खाली काळं काहीतरी दिसलं, काहीतरी कोरलेलं, तेवढ्यात तिने सगळे केस डाव्या हाताने डाव्या खांद्यावरून खाली घेतले, तेव्हा मी दचकलो ... माझे डोळे विस्फारले ... पाय जमिनीत रुतले ... हात सुन्न झाले आणि अंगाला दरदरून घाम फुटला ...

कारण तिच्या पाठीवरही तेच होतं ... तेच हिंसक ... दुष्ट आणि क्रूर … तेच गोंदण

उग्र काळ्या रंगाचं, गोल गोल डोळ्याचं … माझ्याकडेच नजर रोखून पाहणारं …. अपशकुनी … घुबड.




**अनुप साळगांवकर**

यांची ई साहित्यवरील पुस्तके

कव्हरवर एक क्लिक करा आणि – थांबा – आणि- वाचा. अख्खं पुस्तकच हजर.



**ई साहित्य प्रतिष्ठानचं तेरावं वर्षं.**

**अनुप साळगांवकर यांचं ई साहित्यवर हे तिसरं पुस्तक.**

अनुप हे कोकणाच्या रसाळ फळांसारखे लेखक आहेत. आपल्या लेखनात ते वैविध्यता ठेवतातच पण जो प्रकार हाताळायचा त्यात सखोल अभ्यासून ते प्रकटतात. बालसाहित्य, प्रवास आणि गूढकथा असे विविध प्रकार ते लीलया झेलतात आणि त्या त्या प्रकारानुसार त्यांची लेखणी तो तो रस स्त्रवते. त्यांच्या पुस्तकांना फ़ार मोठा वाचक वर्ग लाभतो.

लेखक प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांची पुस्तकं कितीही चांगली असली तरी विकली जात नाहीत. त्यामुळे त्यांना प्रकाशक त्यांची पुस्तकं छापत नाहीत. कधीकधी तर न वाचताच परत करतात. आणि प्रकाशन झालेच नाही तर हे नवीन लेखक प्रसिद्ध होणार कसे? या दुष्टचक्रात अनेक प्रतिभा गर्भातच मारल्या जातात. अगदी "मृत्युंजय"कार शिवाजी सावंत यांचं पुस्तक तीन वर्षं कोणी प्रकाशक वाचूनही पहात नव्हता. या दुष्टचक्रातन अनेक तरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

आता नेटवर नवलेखकांना वाचकांपर्यंत पोहोचवण्याचे काम अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान त्यातील एक. ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही.

भविष्य काळात लेखकांना भरघोस मानधन देण्याची ई साहित्यची इच्छा आहे. नवीन उत्कृष्ट लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस स्तुती तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. सुरूची नाईक, प्रफुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनुप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, निरंजन कुलकर्णी, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ कोरगांवकर, मिलिंद कुलकर्णी, शुभम पाटील, आशिष कर्ले, सुरेंद्र पाथरकर, प्रीती सावंत दळवी, निमिष सोनार, उमा कोल्हे, गणेश ढोले, सचिन तोडकर, महेश पाठाडे, अभिजीत पैठणपगारे, कार्तिक हजारे, किरण दशमुखे, जगदिश खांदेवाले, माधुरी नाईक, विशाल दळवी, गौरी कुलकर्णी, जितेश उबाळे, प्रितम साळुंखे, स्वीटी महाले, अंबरीश गुरव, अविनाश जामदार, गौरव नायगांवकर, प्रणिता ठाकूर, अनिल पिसे, अनामिका बोरकर, पवन सोनवणे, राजेंद्र शेळके, पुर्वा राउत,

धनंजय कलमष्टे, वैभव तांबटकर, बाळासाहेब शिंपी असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत.

मराठीत हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे, आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ौज मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

बस्स. अजून काय पाहिजे?


www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com